। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १२१ वा । शनिवार दिनांक १८ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### गोवंशीय मांस वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल.

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, जमीर तय्यब पठाण, वय २१ वर्षे, आसिफ अली सय्यद, वय २० वर्षे, दोघे रा. खडकत ता. आष्टी जि. बीड यांनी दि.१६.०७.२०२६ रोजी ००.३० वा. सु. धाराशिव ते तुळजापूर बायपास रोडवर मोर्डा ब्रिजच्या पुढील बाजूस महिंद्रा एक्सयुव्ही ५०० कंपनीची कार क्र एमएच ४६ एक्स ९२४५ मध्ये गोवंशीय जातीचे २०० किलो ग्रॅम मांस विक्रीसाठी वाहतुक करत असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(क), ९(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई.

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत शिवाजी वय ६२ वर्षे, रा. वत्सलानगर ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि १६.०७.२०२६ रोजी १८.४० वा. सु.आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ५,००० किंमतीची ५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.तर लक्ष्मी वय ४५ वर्षे, रा. वत्सलानगर ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि १६.०७.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत शिवाबाई वय ६५ वर्षे, रा. तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव या दि १६.०७.२०२६ रोजी तुरोरी येथील पाण्याचे टाकीजवळ आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,४०० किंमतीची १४ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर काशिनाथ वय ४७ वर्षे, रा. कराळी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि १६.०७.२०२६ रोजी १७.५० वा. सु.आपल्या राहत्या घरासमोर कराळी येथे अंदाजे १,९०० किंमतीची १९ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

### मोटारसायकलची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अजित भिमराव बनसोडे, वय ३० वर्षे, रा.गोरमाळा ता. भुम जि. धाराशिव यांची मोटरसायकल ही दि. १३.०७.२०२६ रोजी यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## 'माय भारत' विशेष नोंदणी अभियानाला धाराशिव जिल्ह्यात प्रारंभ ; १८ ऑगस्टपर्यंत युवकांना नोंदणीची संधी




धाराशिव (जिमाका) -देशातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी करून त्यांच्या नेतृत्वगुणांना चालना देण्याच्या उद्देशाने युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या 'माय भारत' (Mera Yuva Bharat) उपक्रमांतर्गत जिल्ह्यात विशेष नोंदणी अभियानाला गुरुवारी १६ जुलै रोजी प्रारंभ झाला.

१ जुलै ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानाद्वारे जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींना 'माय भारत' पोर्टलशी जोडून स्वयंसेवा, नेतृत्व विकास,कौशल्यविकास, अनुभवानिष्ठ शिक्षण तसेच विविध शासकीय उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात गुरुवारी आढावा बैठक घेतली.या बैठकीस विविध विभागांचे अधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

या अभियानादरम्यान जिल्ह्यातील महाविद्यालये, शाळा, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था तसेच विविध शासकीय कार्यालयांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नोंदणी मोहीम राबविण्यात येणार आहे.युवकांनी मोबाईल क्रमांक, ई-मेल आणि आवश्यक कागदपत्रांच्या सहाय्याने 'माय भारत' पोर्टलवर विनामूल्य नोंदणी करून शासनाच्या विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी केले.

युवकांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक अथवा क्यूआर कोडच्या माध्यमातूनही 'माय भारत' पोर्टलशी सहज जोडता येणार आहे.यासंदर्भातील सविस्तर माहिती पीपीटीच्या माध्यमातून 'मेरा युवा भारत' विभागाकडून बैठकीत सादर करण्यात आली.

'माय भारत' हा केवळ नोंदणीचा उपक्रम नसून युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणारा आणि समाजसेवेची संधी उपलब्ध करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.या माध्यमातून युवकांना स्वयंसेवा, सामाजिक बांधिलकी, नेतृत्व विकास, कौशल्यवृद्धी तसेच विविध शासकीय कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभागाची संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

जिल्ह्यातील सर्व युवक-युवती, माय भारत,राष्ट्रीय सेवा योजना (NSS), एनसीसी (NCC), शैक्षणिक संस्था तसेच युवक संघटनांनी या विशेष नोंदणी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून अधिकाधिक युवकांची नोंदणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा,असे आवाहन मेरा युवा भारत,धाराशिव कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सीईओ महाडदळकरांनी विद्यार्थ्यांची घेतली 'गुणवत्तेची परीक्षा': जिल्हा परिषद शाळेला भेट



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांनी मंगळवारी (दि. १४) सकाळी कसबे तडवळे येथील जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच शाळेतील शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि उपलब्ध सुविधांचा आढावा घेतला.

महाडदळकर यांनी सकाळी साडेआठ वाजता शाळेला भेट देत इयत्ता पहिली ते सहावीच्या वर्गांना भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली. इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांकडून पाठ्यपुस्तकाचे वाचन करून घेतले, तर पाचवीच्या विद्यार्थ्यांशी इंग्रजी विषयावर चर्चा केली. विद्यार्थ्यांना मोठे झाल्यावर काय होणार? असा प्रश्न विचारून त्यांच्या भविष्यातील ध्येयांविषयी त्यांनी माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या उत्तरांवर समाधान व्यक्त करत त्यांना सातत्याने अभ्यास करण्याचा सल्ला दिला. गणित विषयाच्या नवोदय स्पर्धा परीक्षेच्या सराव वह्यांचीही त्यांनी पाहणी केली.

शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांचा 'मिरॅकल' हे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पाचवीतील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना 'मन में है विश्वास' हे पुस्तक भेट देण्यात आले. तसेच डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यानंतर महाडदळकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकास भेट देऊन माहिती घेतली. शाळेच्या भौतिक सुविधांचा आढावा घेताना दोन नादुरुस्त वर्गखोल्यांच्या निर्लेखनाबाबत शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापकांकडून माहिती घेऊन आवश्यक सूचना दिल्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय पवार, मुख्याध्यापक केशव पवार, सदस्य राहुल नाईकनवरे, भागवत शिंदे, तेजस भालेराव, पवन करंजकर, नानासाहेब पवार, भारत लोंढे, माजी अध्यक्ष अमोल पवार, सोमनाथ भोसले, राजेंद्र करंजकर, प्रशांत सदावर्ते, बाळासाहेब करंजकर तसेच शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे सीईओंकडून कोड कौतुक मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा महाडदळकर यांनी शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रमांची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या वाचन, इंग्रजी संभाषण आणि स्पर्धा परीक्षा तयारीचे त्यांनी कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी मेहनत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. शाळेतील शिक्षकांनी राबविलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सकारात्मक बदल दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले. शाळेच्या भौतिक सुविधांबाबतही त्यांनी माहिती घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत मिनी ऑइल मिल, एक्सपेलरसाठी अनुदानाची सुवर्णसंधी

### महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन; महिला शेतकरी व एफपीओंना प्राधान्य

धाराशिव,दि.१७ जुलै (जिमाका) राज्यातील तेलबिया उत्पादनाला चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने कृषी विभागामार्फत राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया (NMEO-OS) २०२६-२७ ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत शेतकरी,शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO/FPC) तसेच मूल्य साखळी भागीदार गटांना (VCP) प्रक्रिया उद्योगात आत्मनिर्भर बनविण्यासाठी 'मिनी ऑइल मिल/ एक्सपेलर' या घटकावर आकर्षक अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत मिनी ऑइल मिल/एक्सपेलर खरेदीसाठी शासनाकडून दोन प्रकारे आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. फिल्टर प्रेससह मिनी ऑइल मिल/एक्सपेलर या प्रकारासाठी शासनाने प्रति युनिट ४ लाख रुपये इतकी उच्चतम अनुदान मर्यादा निश्चित केली आहे. या घटकासाठी जिल्ह्यास ११ युनिटचा भौतिक लक्षांक प्राप्त झाला आहे. अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,अल्प व अत्यंत अल्प भूधारक शेतकरी तसेच महिला प्रवर्गातील लाभार्थ्यांना युनिटच्या एकूण किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे.तर सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेपर्यंत अनुदान मिळणार आहे.

तसेच फिल्टर प्रेसशिवाय मिनी ऑइल मिल/एक्सपेलर या प्रकारासाठी प्रति युनिट ३ लाख रुपये इतकी उच्चतम अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या घटकासाठीही जिल्ह्यास ११ युनिटचा भौतिक लक्षांक मंजूर झाला आहे.या योजनेत अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,अल्प व अत्यंत अल्प भूधारक शेतकरी आणि महिला प्रवर्गाला युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम मर्यादेपर्यंत,तर सर्वसाधारण प्रवर्गाला युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेपर्यंत अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या योजनेचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO/ FPC) आणि मूल्य साखळी भागीदार गट (VCP) घेऊ शकतात.लाभार्थी निवडीमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार असून, लक्षांक शिल्लक राहिल्यास वैयक्तिक लाभार्थ्यांचा विचार केला जाईल.तसेच आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त महिला शेतकऱ्यांनाही विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

ही योजना कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येणार आहे.या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र लाभार्थ्यांनी २५ जुलै २०२७ पर्यंत महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करावेत. पोर्टलवर प्राप्त झालेल्या अर्जांमधून राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (NMEO-OS) अंतर्गत प्राधान्याने लाभार्थी निवड केली जाणार आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी उत्पादक कंपन्या, महिला शेतकरी आणि इतर पात्र घटकांनी या योजनेचा लाभ घेऊन प्रक्रिया उद्योगात पाऊल टाकावे,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू ; विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव,दि.१७ जुलै (जिमाका) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या अधिपत्याखाली कार्यरत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह,लोहारा येथील मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.पात्र विद्यार्थ्यांनी शासनाच्या अधिकृत https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासकीय वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक व मूलभूत सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातात.यामध्ये मोफत निवास,शालेय विद्यार्थ्यांना मोफत स्टेशनरी साहित्य, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्टेशनरीसाठी वार्षिक चार हजार रुपये,शालेय विद्यार्थ्यांना ड्रेस कोडसाठी एक हजार रुपये,तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दोन हजार रुपये दिले जातात.तसेच वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रुपये निर्वाह भत्ता,सकस व पौष्टिक भोजन, सुरक्षित व शैक्षणिक वातावरण,शुद्ध पिण्याचे पाणी,वीज,स्वच्छ वसतिगृह, अध्ययन कक्ष,ग्रंथालय,संगणक व इंटरनेट सुविधा (उपतेनुसार),क्रीडा साहित्य, सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकास उपक्रम,स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी पुस्तके,वर्तमानपत्रे,स्पर्धा परीक्षा विषयक मासिके तसेच शासनाच्या नियमानुसार इतर विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.त्यामुळे ग्रामीण भागातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी मोठी मदत होत आहे.

इयत्ता आठवी ते पदव्युत्तर शिक्षण घेणारे समाज कल्याण विभागाच्या नियमानुसार पात्र विद्यार्थी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करू शकतात.अर्ज भरताना सर्व आवश्यक कागदपत्रे अचूकपणे अपलोड करावीत,असेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहाचा ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे बंधनकारक असून,शासकीय वसतिगृहाचा ऑनलाइन प्रवेश अर्ज न भरल्यास स्वाधार शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही,याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी,असे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहायक आयुक्त यांनी कळविले आहे.

## कळंबमध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणात चहा-जेवणाचाही बोजवारा; नियोजनशून्य कारभाराविरोधात संताप

कळंब (प्रतिनिधी) राज्य शासनाच्या पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षणासाठी निधी मागणीनुसार उपलब्ध होणार असतानाही कळंब येथे प्रशिक्षण घेणाऱ्या सुमारे १२० शिक्षक-शिक्षिकांना चहा, जेवण आणि पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहावे लागल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव यांच्या नियोजनशून्य कारभारामुळे प्रशिक्षणार्थी शिक्षकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका व खाजगी अनुदानित शाळांतील इयत्ता तिसरीला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षण दि . १५ ते १८ जुलै या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत दोन केंद्रांवर आयोजित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद प्रशाला (मुलांची शाळा) येथे ५५ शिक्षक प्रशिक्षणासाठी आणि भैरवनाथ अध्यापक विद्यालय, ढोकी रोड येथे ६५ शिक्षकांचे हे प्रशिक्षण सुरू आहे. ईटकूर, गौर, आंदोरा, येरमाळा, मोहा, शिराढोण, पाडोळी, गोविंदपूर, लोटा पूर्व आणि कळंब शहर परिसरातील जवळपास १२० शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत. शासनाच्या नियमानुसार प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना दोन वेळचा चहा, दुपारचे जेवण, आवश्यक स्टेशनरी तसेच प्रशिक्षण देणाऱ्या तज्ज्ञांना मानधन देण्याची तरतूद आहे. मात्र कळंब आणि वाशी येथे ही मूलभूत सुविधाच उपलब्ध करून देण्यात आली नाही. दिवसभर प्रशिक्षण घेऊनही शिक्षकांना स्वतःच्या खर्चाने चहा-नाश्ता आणि जेवणाची व्यवस्था करावी लागल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी,दगडाने मारहाण करुन गंभीर केल जखमी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, अंशु कसबे, प्रतिक गायकवाड, गणेश खरडेकर, राणा सरवदे सर्व रा. कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१६.०७.२०२६ रोजी देशमुख हॉस्पीटल कळंब समोर फिर्यादी नामे-अभिजीत संजय आंबीरकर, वय २२ वर्षे, रा. डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव यांना नमुद आरोपींनी मागील भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करुन गंभीर जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अभिजीत आंबीरकर यांनी दि.१६.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे कळंब येथे भा.न्या.सं.कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) (३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## स्वार्थी असावे मात्र एवढेही स्वार्थी नसावे

स्वार्थी असावे मात्र एवढेही स्वार्थी नसावे जेणे करून आपला धर्म संकटा बरोबर बदनाम होवू शकेल, मुळात धर्मनिरपेक्ष म्हणजे काय हेच जाणून घेतले जात नाही. आयोध्येतील राममंदीरात जी चोरी झाली यावर राजकारण खेळले जात आहे. चोरी झाल्यावर चौकशी होते. चोर पकडला जातो व पुन्हा चोरी होवू नये याची खबरदारी घेतली जाते. उपायोजना केली जाते. असे असताना या बाबत राजकारण खेळले जात आहे हे दुर्दैवी बाब आहे. राम मंदीरातच चोरी झाली इतर मंदिरात किंवा धार्मिक स्थळाच्या ठिकाणी झालीच नाही असे झाले नाही. इतरही ठिकाणी चोरी होतात. चौकशी होते. तपासनंतर सत्य बाहेर येते. ही उपायोजना आहे. असे असताना केवळ राजकारण खेळले जात असेल तर ते योग्य नाही. भारतात अनेक जाती धर्म व मत पंथाचे नागरिक राहातात. विविधेतून एकता साधली जाते. विविध सण-उत्सव साजरे केले जातात. यात सर्वच धर्माच्या मंडळीचा समावेश होतो हे बाब सर्वांना माहिती आहे. त्यामुळे धार्मिकतेत राजकारण खेळले जात असेल तर ते योग्य नाही. धार्मिक स्थळी चोरी होणे योग्य नाही. त्याचे समर्थन कोणीही करणार नाही. इतर ठिकाणाची चोरी व धार्मिक स्थळाच्या ठिकाणाची चोरी यात फरक आहे. श्रद्धा, अस्था धार्मिकस्थळी असते. धार्मिक स्थळाच्या ठिकाणी हजारोंच्यासंख्येने भक्त गण सोन्या, चांदीच्या वस्तू दान करतात. नोटाचे बंडल दान करतात. अनेक ठिकाणी तर सोन्याचे मुकुट, विविध अभुषन दान केले जातात. श्रद्धा व भावनिकतेचा प्रश्न आहे. अशा ठिकाणी ज्या प्रकारे सरकारचे नियंत्रण असावयास पाहिजे ते दिसून येत नाही. खाजगी लोकांच्या हाती धार्मिकस्थळे सोपविली गेली आहेत. वास्तविक वचक असाला पाहिजे. त्या धार्मिकस्थळाच्या ठिकाणी काय चालले आहे याची माहिती सरकारला असली पाहिजे. कोणते शिक्षण दिले जाते. कोणती भाषा, कोणते कार्य केले जाते. सामाजिक उपक्रमाची बाजू भक्कम आहे का? अनेक असे धार्मिकस्थळे आहेत की, तेथे सामाजिक उपक्रम व जबाबदारी पुर्ण केली जाते. गजवंताच्या समस्या सोडविल्या जात आहेत. कोठे नैसर्गिक संकट निर्माण झाले तर त्याला धावुन जाणारे अनेक धार्मिक स्थळे आहेत. याच देशात वाईट हेतूने प्रेरीत होवून काम करणारे स्थळे आहेत. अनेक ठिकाणी देशविरोधी ज्ञान दिले जात असेल किंवा शस्त्रात्रे ठेवली जात असेल तर ते योग्य नाही. या बाबत विचार केला जावा. धार्मिक स्थळे हे ज्ञान देणारी ठिकाणे आहेत. भांडार आहेत. नको त्या बाबी किमान या ठिकाणी घडू नये. कारण पवित्र ठिकाणाचे पावित्र्य राहाण्याची जबाबदारी सर्वांची आहे. ती राखली पाहिजे. काही ठिकाणी नको त्या बाबी धार्मिक स्थळाच्या ठिकाणी दिसून येतात. जेथे धार्मिक शिक्षण दिले जाते तेथे तर वाईट बाबीचा वास देखिल आला नाही पाहिजे. जीवन अमुल्य आहे. हिंदुसमाज हा धार्मिकतेला मानणारा आहे त्यामुळे त्यांच्या भावनेला ठेच लागेल असे काही घडू नये. मुळात धार्मिकस्थळाच्या ठिकाण काय चालले आहे हे सरकारने पाहिले पाहिजे. याकडे सर्वांचा पाहाण्याचा दृष्टिकोना हा वेगळा, भावनिक असतो. पवित्र असतो. यामध्ये व्यवहार किंवा अन्य बाबीचा विचार केला जात नाही. असे असताना देखिल काहीजन काही बाजू समजून न घेता टिका-टिप्पनी करीत असतील तर ते योग्य नाही. केवळ राममंदीराची बदनामी व्हावी हा दृष्टिकोन ठेवुन वागत असतील तर ते योग्य नाही. देश मोठा आहे. अनेक राज्य आहेत. विविध राज्यात विविध धार्मिकता आहे. भारतात जेवढे देव-देवता असतील तेवढ्या इतर देशात नसतील. त्यामुळे कोणाची तरी भावना दुखविणे किंवा कोणाचीतरी बदनामी करणे हा विषय हाताळणे योग्य नाही. अनेक ठिकाणी चुकीचे प्रकार होत असतील. नको ते प्रकार होत असतील. स्वत:ला संत समजणारे हे जेलची हवा खात आहेत तर काही जामीनवर सुटले आहेत. हे माहिती आहे तरी आजही त्या चुकीच्या लोकांचा जय-जयकार करणारे चेले दिसून येत आहे हेच भारताचे मोठे दुर्दैव आहे. आज राम मंदिरात चोरी झाल्याने बदनामीसाठी जो केविलवाणा प्रकार चालू आहे ते इतरांनी विचार करायाला लावणारा आहे. महाराष्ट्रातील एकमेव असा पक्ष आहे तोच एकमेव या बाबत आवाज उठवित आहे. लोकशाहीत तो त्यांचा अधिकार आहे. लोकशाहीत याचाही विचार केला पाहिजे. इतर धार्मिकस्थळाच्या ठिकाणी सर्व काही व्यवस्थित आहे असे त्यांना वाटत असणार! मुळात ही घटना उत्तरप्रदेशातील आहे. याचे पडसाद महाराष्ट्रात उमटत आहेत. तसे पाहिले तर बांगला देशात हिंदुंची हत्त्या झाली ते या महाराष्ट्रातील जे आज आवाज उठवित आहे त्यांची तोंडे बंद होती. बांगला देशात काय आपल्या पश्चिम बांगल मध्ये ममता बॅनर्जी यांची सत्ता असताना हिंदुसमाजावर अन्याय होत असताना ते या मंडळींना दिसून आले नाही. त्यामुळे खरेच सामाजिक अस्था म्हणून कार्यरत आहेत का? या बाबत जनता निश्चित विचार करणार! आज एक तर राज्यातून सत्ता गेली. लोकप्रतिनिधी साथ सोडून जात आहेत. पक्ष राहातो का? असे दिसून येत आहे. अशा स्थितीत उत्तरप्रदेशातील राममंदिरात चोरीचे प्रकरणाबाबत आवाज उठवित आहे. याबाबत प्रपोकंडा करीत आहेत, केवळ हिंदु समाजाला एका प्रकारे बदनाम करण्याचा हा डाव असू शकतो. केवळ हिंदुच्या मंदिरात चोरी झाली, इतर ठिकाणी झालीच नाही असे नाही. चोरी ही वाईट आहे मग धार्मिकस्थळाची असो किंवा देशातील इतर कोणत्याही ठिकाणाची असो हे वाईट आहे. त्याचे कोणीही समर्थन करू शकणार नाही. त्यामुळे सर्वांनी विचार केला पाहिजे, स्वत:ला रामभक्त समजणारे व रामभक्तांची साथ सोडून गोहत्या करणाऱ्यासोबत राहाणारे योग का अयोग्य आहेत? ज्या प्राण्यांना गोमाता मानले जाते. धार्मिकमोठे स्थान दिले जाते. पवित्र समजून पुजा केली जाते. त्याची हत्त्या करणे योग्य नाही. देशातील काही अयोग्य घडामोडीवर नागरिकांनीच जागृत राहीले पाहिजे. जे अयोग्य आहे तीच्याविरोधात राण उठविले पाहिजे. चुकीचे कोणी करीत आहे त्याला रोखले पाहिजे. देशातील जनता राम, श्रीकृष्णाला आपले मानते, वंशज मानते याबाबीकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. स्वार्थीपनाचा कळस काढणाऱ्यास रोखले पाहिजे.

## संतसेवा आणि समाज सेवेचा वारसा जपणारे व्यक्तिमत्व : नंदुशेठ पालकर



समाजात अनेक व्यक्ती जन्माला येतात परंतू कांही मोजकीच माणसे आपल्या कार्याने समाजाच्या मनावर कायम स्वरूपी ठसा उमटवितात. आपल्या विचारांची स्पष्टता आणि समाजाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर लोकांच्या हृदयात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्वामध्ये कराड चे वैभव आणि पंढरपूर च्या श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज समाधी मंदिर ट्रस्ट, महाद्वार चे विद्यमान अध्यक्ष आदरणीय श्री. आनंदराव उर्फ नंदुशेठ पालकर यांचे नांव आदराने घेतले जाते. समाज भूषण, समाज गौरव, सुवर्ण उद्योग रत्न, आदी पुरस्कार प्राप्त जेष्ठ समाज सेवक आणि एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून स्वतःची त्यांनी वेगळीच ओळख निर्माण केली आहे.

त्यांनी केवळ वाड-वडिलांचा महान वारसा जपला नाही, तर आपल्या कर्तृत्वाने त्याला नव्या शिखरावर घेऊन गेले आहेत. कराडचे वैभव आणि सोनार समाजाची शान असलेले आदरणीय श्री.आनंदराव उर्फ नंदुशेठ पालकर हेच शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीचा प्रत्यक्ष वस्तुपाठ आहेत.

त्यांच्या समृद्ध घराण्याचा इतिहास,आई वडिलांचे संस्कार, तीर्थ स्वरूप बापूंचे प्रती असलेली अथांग भक्ती, अफाट जनसंपर्क आणि मुख्यत्वे त्यांचा अथांग मानवतावादी दृष्टिकोन या सर्व पैलूंना गुंफणारा हा विशेष लेख.

**गौरवशाली कौटुंबिक वारसा**

श्री. नंदुशेठ पालकर यांना लाभलेला कौटुंबिक वारसा अत्यंत पवित्र आणि गौरवशाली आहे. त्यांचे स्वर्गीय चुलते दिगंबरराव काशिनाथ पालकर उर्फ बापू हे सामाजिक, शैक्षणिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते. बापू हे पंढरपूर येथील श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज समाधी मंदिर महाद्वार चे अनेक वर्षे अध्यक्ष होते.

श्री. नंदुशेठ हे वाणिज्य शाखेचे पदवीधर आहेत. शिक्षण घेत असतानाच तरुण वयात त्यांनी सराफी व्यवसायाची धुरा सांभाळली. १९३३ साली त्यांच्या आजोबानी स्थापन केलेल्या *पालकर सुवर्ण पेढी* चा व्यवसाय त्यांनी शुद्धता, सचोटी व विश्वासार्हता या त्रिसूत्रीवर चालवत कराड शहर व परिसरात नावाजलेले आणि विश्वसनीय सराफ व्यावसायिक म्हणून नांवलौकिक मिळवला.

**श्री.संत शिरोमणी नरहरी महाराज समाधी मंदिर ट्रस्टचे नेतृत्व**

कोणत्याही संस्थेची प्रगती ही त्या संस्थेच्या नेतृत्वावर अवलंबून असते, हे नंदुशेठ पालकर यांच्या बाबतीत तंतोतंत लागू होते. संत नरहरी महाराजांच्या सेवेचा वसा व वारसा त्यांच्या घराण्यात आहे. स्वर्गीय बापूंच्या पावलावर पाऊल ठेवत सन २०२५ मध्ये श्री. नंदुशेठ पालकर यांची श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज समाधी मंदिर ट्रस्ट, पंढरपूर च्या अध्यक्षपदी निवड झाली.

ते सध्या दिगंबर काशिनाथ पालकर शिक्षण संस्था, कराड चे अध्यक्ष देखील आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व शांत, संयमी व निगर्वी आहे. आपलेही आयुष्य नरहरी सेवेत, गोरगरीब व समाजाकरिता समर्पित करायचे हा त्यांच्या मनाचा निर्धार आहे आणि हीच शिकवण त्यांनी सर्व पालकर कुटुंबियांना दिली आहे.

**पंढरपूर मंदिर कॉरिडॉरमध्ये नरहरी मंदिराचा समावेश**

सध्या शासनाच्या माध्यमातून पंढरपूर येथे सुरू असलेल्या पंढरपूर मंदिर कॉरिडॉर प्रकल्पात भक्तांच्या मागणीनुसार श्री.संत शिरोमणी नरहरी महाराज मंदिर चा देखील समावेश करण्यात आला आहे. अध्यक्ष नंदुशेठ पालकर यांनी या निर्णयाचे स्वागत करत सांगितले की, नरहरी महाराज हे श्री विठ्ठलाचे अनन्य भक्त होते. कॉरिडॉरमध्ये त्यांच्या मंदिराचा समावेश झाल्याने भाविकांना श्रींच्या दर्शनाबरोबरच संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या स्थानांचेही दर्शन एकाच वेळी घेता येणार आहे. हा संत परंपरेला दिलेला मोठा सन्मान आहे.

**बहुआयामी कार्य**

नंदुशेठ व त्यांच्या पत्नी *सौ. सुरेखा ताई* या दोघेही कराड नगर परिषदेत नगरसेवक म्हणून निवडून आले होते. नंदुशेठ यांनी कराड अर्बन बँकेचे उपाध्यक्ष पद ही भूषविले आहे.

मे. दिगंबर काशिनाथ पालकर ब्रदर्स सराफ आणि ज्वेलर्स, डी.के. पालकर फायनान्स, पालकर फार्मास्युटीकल्स, पालकर पेट्रोलियम, डी.के. पालकर एच.पी. गॅस, डी.के. पालकर कन्स्ट्रक्शन, पालकर आयुर्वेद हॉस्पिटल अशा विविध उद्योगांत त्यांनी उत्तुंग भरारी घेतली आहे. त्यांनी एक महिला पतसंस्था स्थापन केली आहे.वत्सलानगर कराड येथील श्री. गणेश मंदिर, श्री. कालिका मंदिर, श्री. विश्वकर्मा मंदिर, श्री. व्यंकटेश मंदिर आणि श्री. पद्मावती मंदिर अशी पाच मंदिरे उभारून कराडच्या वैभवात भर घातली आहे आणि या पाच मंदिराचे व्यवस्थान ते गेली २५ वर्षे समर्थपणे सांभाळत आहेत.

त्यांचे मोठे चिरंजीव सराफी व्यवसाय सांभाळत असून लहान चिरंजीव मुंबई उच्च न्यायालयात ॲडव्होकेट आहेत. पत्नी सौ. सुरेखा ताई या पालकर शिक्षण संस्थेच्या सचिव आहेत.

*समाजसेवेला आणि संत वारशाला पाठबळ*

सोलापूर सोनार समाज संस्थेला कोर्टी येथील श्री.संत नरहरी महाराज यांचे आई सावित्रीबाई, वडील अच्युतबाबा आणि लहान बंधू नारायण स्वामी यांच्या समाधी स्थळाच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज मंदिर समिती, पंढरपूर चे अध्यक्ष श्री. नंदुशेठ पालकर व सर्व पदाधिकारी आणि विश्वस्त यांनी पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे.

१५ दिवसांपूर्वी समाधी स्थळाची मोजणी पूर्ण झाली असून, सध्या प्लॅन व इस्टिमेट तयार करून मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर टेंडर प्रक्रिया होऊन कामाला सुरुवात होईल. या पवित्र कार्यासाठी मंदिर समितीचे सर्वतोपरी सहकार्य राहील, असे नंदुशेठ पालकर यांनी सांगितले.

अशा प्रकारे संतसेवा, समाजसेवा आणि व्यवसाय , शिक्षण व अर्थकारण या क्षेत्रात आदर्श निर्माण करणारे नंदुशेठ पालकर हे खऱ्या अर्थाने कराड आणि पंढरपूरचे भूषण आहेत.

श्री. आनंदराव यांच्या अखंड सामाजिक कार्याबद्दल आजवर त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले आहेत. हे सर्व पुरस्कार त्यांच्या निःस्वार्थी सेवेचीच पावती आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व इतके वजनदार आणि अजातशत्रू आहे की, सामाजिक क्षेत्रात आणि सोनार समाजात त्यांचा प्रचंड दबदबा आणि आदर आहे.

आई वडिलांचे आदर्श, ती. स्व. बापूंचे स्मृती आणि गरिबांना, वंचित घटकांना, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देणारे त्यांचे सोन्यासारखे शुद्ध अंतःकरण या सर्वांचा त्रिवेणी संगम म्हणजेच श्री. आनंदराव उर्फ नंदुशेठ पालकर होत.

इतिहासाने ती. बापूंच्या कार्याला जसा आदराने नमस्कार केला, तसाच भविष्यकाळ नंदुशेठ यांच्या या दिव्य, भव्य आणि अद्वितीय मानवतावादी कार्याची नोंद सुवर्ण अक्षरांनी निश्चितच घेईल. ते केवळ सोनार समाजाचेच नव्हे तर महाराष्ट्राचे भूषण आहेत.

आदरणीय आनंदराव उर्फ नंदुशेठ पालकर यांच्या पुढील वाटचालीस, उत्तरोत्तर यशास, दीर्घायुष्यास आणि निरोगी आरोग्यास मनःपूर्वक आणि अनंत शुभेच्छा!

**– वसंत रा. पोतदार, अध्यक्ष**
**सोनार समाज संस्था, सोलापूर**
**मोबा. ९४२३० ६५९१५**

# प्रकल्पग्रस्तांच्या सुलभ पुनर्वसनासाठी व्यापक धोरणात्मक सुधारणांना गती

**मुंबई/प्रतिनिधी:** सार्वजनिक प्रकल्पांसाठी भूसंपादनामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्यासाठी आवश्यक धोरणात्मक सुधारणाचा मसुदा सादर करण्याचे निर्देश मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी दिले. हा मसुदा तयार करतांना प्रकल्पग्रस्तांचे हित केंद्रस्थानी ठेवण्याचे निर्देशही राज्यमंत्री ॲड. जयस्वाल यांनी यावेळी दिले

मंत्रालयात आयोजित या बैठकीमध्ये संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पुनर्वसन कायदा, पर्यायी जमीन वाटप, भूसंचय (लँड बँक), गावठाण भूखंड उपलब्धता आणि प्रकल्पग्रस्तांना रोजगार अथवा विकसित भूखंडाचा पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्यमंत्री ड. जयस्वाल म्हणाले, राज्यातील विविध सार्वजनिक प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या नागरिकांच्या पुनर्वसनाशी संबंधित अडचणींबाबत शासन संवेदनशील आहे. त्यामुळे पुनर्वसन धोरणात सुधारणा आवश्यक आहेत. त्याअनुषंगाने पर्यायी जमिनींच्या वाटपासाठी जिल्हानिहाय भूसंचय अधिक सक्षम पद्धतीने करावा. तसेच विस्थापितांना गावठाण भूखंड उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती तसेच नवीन भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना अधिनियम, २०१३ अंतर्गत प्रकल्पग्रस्तांना एकरकमी भरपाईऐवजी रोजगार अथवा विकसित भूखंडाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र धोरणाचा मसुदा तयार करण्याचे निर्देश ॲड. जयस्वाल यांनी अधिकाऱ्यांना दिले.

राज्यमंत्री ॲड. जयस्वाल म्हणाले, धोरणाचा मसुदा तयार करतांना पुनर्वसन प्रक्रियेत होणारा विलंब टाळण्यासाठी प्रत्येक टप्प्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी. जिल्हानिहाय भूसंचयाची माहिती अद्ययावत ठेवणे, भूसंचय व्यवस्थापनासाठी राज्यस्तरीय संकेतस्थळ विकसित करणे, पर्यायी जमिनींच्या वाटपाची प्रक्रिया अधिक पारदर्शक करणे आणि विभागीय आयुक्त स्तरावर नियमित आढावा घेण्याची कार्यपद्धती विकसित करणे आदी सर्व महत्वाच्या मुद्द्याचा त्यात समावेश करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

गावठाण भूखंड वाटपासाठी स्वतंत्र कार्यपद्धती तयार करणे, उर्वरित उपलब्ध गावठाण जमिनींची मोजणी व नोंदणी करणे, नागरिकांना आवश्यक ना-गरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय वाढविणे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाशी संबंधित निर्णय अधिक वेगाने घेण्याचे निर्देशही राज्यमंत्री मंत्री ॲड. जयस्वाल यांनी यावेळी दिले.

## दूध कधी प्यावे? सकाळी की रात्री?

दूध हे संपूर्ण आहार मानले जाते. त्यामध्ये कॅल्शियम, प्रथिने, व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन बी-१२, पोटॅशियम आणि इतर अनेक महत्त्वाचे पोषक घटक असतात. त्यामुळे लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनाच दररोज दूध पिण्याचा सल्ला दिला जातो. मात्र, अनेकजण नियमित दूध पित असूनही त्याचा अपेक्षित फायदा मिळत नाही. यामागे दूध पिण्याची चुकीची वेळ किंवा चुकीची पद्धत हे एक महत्त्वाचे कारण असू शकते.

तज्ज्ञांच्या मते, दूध पिण्याची योग्य वेळ ही प्रत्येक व्यक्तीचे वय, आरोग्य, जीवनशैली आणि उद्देश यावर अवलंबून असते. काही लोकांसाठी सकाळी दूध पिणे अधिक फायदेशीर ठरते, तर काहींना रात्री दूध प्यायल्याने अधिक लाभ होतो. त्यामुळे दूध कधी प्यावे, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**रात्री दूध पिण्याचे फायदे**

तज्ज्ञांच्या मते, रात्री झोपण्याच्या एक ते दोन तास आधी कोमट दूध पिणे अनेकांसाठी फायदेशीर ठरू शकते. दुधामध्ये ट्रिप्टोफॅन आणि मेलाटोनिन हे घटक असतात, जे शांत झोप लागण्यास मदत करतात. तसेच दिवसभराचा थकवा कमी करून शरीर आणि स्नायूंना आराम मिळण्यासही मदत होते. त्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारू शकते.

**सकाळी दूध पिण्याचे फायदे**

जर तुम्हाला दिवसभर उत्साही राहायचे असेल किंवा नियमित व्यायामाची सवय असेल, तर सकाळी दूध पिणे चांगला पर्याय ठरू शकतो. दुधातून शरीराला प्रथिने, कॅल्शियम आणि इतर आवश्यक पोषक तत्त्वे मिळतात. त्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठीही याचा फायदा होऊ शकतो.

दूध कधी प्यावे? सकाळी की रात्री? योग्य वेळ माहिती नसेल तर मिळणार नाही पूर्ण फायदा

**व्यायामानंतर दूध पिणे फायदेशीर**

तज्ज्ञांच्या मते, व्यायामानंतर दूध पिणे स्नायूंच्या पुनर्बांधणीसाठी उपयुक्त ठरते. दुधातील उच्च दर्जाची प्रथिने आणि कार्बोहायड्रेट्स शरीराची ऊर्जा पुन्हा भरून काढण्यास मदत करतात. त्यामुळे नियमित व्यायाम करणाऱ्यांनी वर्कआउटनंतर दूध पिण्याचा विचार करू शकतात.

**रिकाम्या पोटी दूध कोणाला टाळावे?**

प्रत्येकासाठी रिकाम्या पोटी दूध पिणे योग्य असेलच असे नाही. काही लोकांना रिकाम्या पोटी दूध घेतल्यास गॅस, ॲसिडिटी, पोट फुगणे किंवा अपचनाचा त्रास होऊ शकतो. अशा व्यक्तींनी हलका नाश्ता किंवा जेवण झाल्यानंतर दूध पिणे अधिक योग्य ठरते.

**दूध पिताना या गोष्टी लक्षात ठेवा**

खूप थंड दूध पिणे टाळा.

दूध पिल्यानंतर लगेच खूप आंबट किंवा जास्त खारट पदार्थ खाऊ नका.

जर तुम्हाला लॅक्टोज इन्टॉलरन्सचा त्रास असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेऊनच दूध प्या.

दुधात जास्त प्रमाणात साखर घालणे टाळा, कारण त्यामुळे त्याचे आरोग्यदायी फायदे कमी होऊ शकतात.

**दूध पिण्याचे प्रमुख फायदे**

दूध नियमित आणि योग्य पद्धतीने पिल्यास अनेक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात. हाडे आणि दात मजबूत राहण्यास मदत होते. शरीराला उच्च दर्जाची प्रथिने मिळतात. स्नायूंच्या पुनर्बांधणीस मदत होते. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन बी-१२ची गरज पूर्ण होते. तसेच बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटत असल्याने संतुलित आहाराचा महत्त्वाचा भाग म्हणून दूध उपयुक्त ठरते.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, दूध पिण्यासाठी एकच वेळ सर्वांसाठी योग्य असेल असे नाही. आपल्या आरोग्याच्या गरजा, दिनचर्या आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सकाळी किंवा रात्री दूध पिण्याची वेळ ठरवावी. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात दूध घेतल्यास त्याचा शरीराला अधिक फायदा होऊ शकतो.

## तोंड का येते?

तोंड येणे ही अनेकांना भेडसावणारी सामान्य समस्या आहे. गालाच्या आतील भागात, जिभेवर, हिरड्यांवर किंवा ओठांच्या आतील बाजूला लहान जखमा किंवा फोड तयार होतात. आकाराने लहान असले तरी त्यांच्यामुळे खाणे, पाणी पिणे, बोलणे आणि दात घासणेही त्रासदायक होते. त्यामुळे वेदना, जळजळ आणि अस्वस्थता जाणवते.

बहुतेक वेळा तोंड येण्याचा त्रास काही दिवसांत आपोआप कमी होतो. मात्र, तोपर्यंत होणारा त्रास कमी करण्यासाठी काही सोपे घरगुती उपाय फायदेशीर ठरू शकतात. या उपायांमुळे सूज आणि जळजळ कमी होण्यास मदत मिळू शकते. मात्र, तोंड वारंवार येत असेल किंवा दोन आठवड्यांहून अधिक काळ त्रास कायम राहत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

.तज्ज्ञांच्या मते, तोंड येण्यामागे अनेक कारणे असू शकतात. शरीरात व्हिटॅमिन बी-१२, लोह किंवा फॉलिक ॲसिडची कमतरता, जास्त ताण-तणाव, हार्मोन्समधील बदल, तोंडाला झालेली दुखापत किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी असणे ही त्यामागची प्रमुख कारणे आहेत. काही वेळा तिखट, मसालेदार किंवा अतिगरम पदार्थ खाल्ल्यानेही हा त्रास वाढू शकतो.



दोन विधेयके ही भाजपसाठी 'शक्तीची चाचणी' आहे. काँग्रेसला एकाकी पाडणे व त्यांना साथ देणारे पक्ष संपवणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. देशभर भाजपचा एकछत्री अंमल कायम राहावा या हेतूने ही विधेयके आणली जात आहेत हे स्पष्ट आहे.

मतदार संघांच्या फेररचनेच्या विधेयकात आपल्या पक्षास योग्य वाटतील त्या तरतुदी असतील तर त्यास पाठिंबा देण्याचा विचार करता येईल, अशा आशयाचे विधान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी केल्याने विरोधी पक्षांमधील संभ्रम कमी होण्याऐवजी वाढला आहे. विधिमंडळात व संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याची तरतूद असणारे विधेयक आणि त्याच बरोबर मतदार संघांची फेररचना करण्याची तरतूद असणारे विधेयक संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनात मोदी सरकार मांडण्याची दाट शक्यता आहे. त्याच बरोबर ती मंजूर व्हावीत यासाठी दोन्ही सभागृहांत दोन तृतीयांश बहुमत 'गोळा' करण्यासाठी सत्ताधारी जोरदार प्रयत्न करत आहेत. या विधेयकास शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पाठिंबा देणार असल्याचे वृत्त काही वृत्तपत्रांनी आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांनी प्रसिद्ध केले होते. ते फेटाळताना, सुळे यांनी ही वृत्ते 'शक्यता व्यक्त' करणारी असल्याची आहेत, असे सांगितले. विधेयकाचा मसुदा अजून जाहीर झालेला नसल्याने त्यावर भूमिका ठरवण्याचा मुद्दा उद्भवत नाही असे त्यांनी म्हटले आहे. 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांशी 'राष्ट्रवादी' चर्चा करेल असे त्यांनी सूचित केले होईल. प्रादेशिक पक्षांनी उपस्थित केलेल्या चिंतांची दखल घेऊन ते बदल विधेयकात करण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. त्यामुळे छोट्या, प्रादेशिक पक्षांना आपल्या बाजूने आणणे भाजपसाठी अवघड नाही. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी उद्धव यांची शिवसेना व तृणमूल मधून आलेल्यांना वेगळ्या गटाची मान्यता लोकसभेचे सभापती ओम बिर्ला देण्याची दाट शक्यता आहे. सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्यांचा अर्थ या पार्श्वभूमीवर तपासला जात आहे. आपल्या पक्षातील खासदारांनी 'एनडीए'कडे जाऊ नये हा हेतू सुळे यांच्या विधानांमागे असावा असे काही जणांचे मत आहे. 'इंडिया' मधील प्रादेशिक पक्षांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह आहे. 'राष्ट्रवादी' तील काही जणांमुळे अन्य पक्षांतील सदस्य जर 'एनडीए' कडे वळले तर काय? ही मोठी चिंता विरोधी पक्षांना सतावत आहे. समाजवादी पक्ष विधेयकास पाठिंबा देण्याची शक्यता कमी आहे. कारण उत्तर प्रदेशा-तील आगामी निवडणूक. मात्र मतदार संघांची संख्या वाढत असताना त्यास विरोध

# नक्की कोणाबरोबर..?

आहे. ही आघाडी फोडण्याच्या दिशेने हालचाली सुरू असाव्यात असे ताज्या घडामोडींवरून वाटते.

विरोधकांत चिंता


गेल्या अधिवेशनात दोन तृतीयांश पाठिंब्या अभावी ही विधेयके पराभूत झाली होती. तेव्हा काही विधानसभांच्या निवडणुका व्हायच्या होत्या. तृणमूल काँग्रेस अखंड होता, द्रमुकची काँग्रेसला साथ होती. विधेयकांच्या बाजूने तेव्हा २९८ मते तर विरोधकांच्या बाजूने २३० मते पडली होती. त्या दिवसापासूनच आपली 'शक्ती' वाढवण्याचे डावपेच आखण्यास भाजपने सुरुवात केली असणार. पश्चिम बंगालच्या निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेस सतत फुटत आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून काही खासदार भाजपच्या 'एनडीए' कडे गेले. त्यामुळे लोकसभेतील त्या आघाडीचे संख्याबळ आता ३१९ झाले आहे. दोन तृतीयांशसाठी आणखी ७ मतांची गरज आहे. शरद पवार यांच्या 'राष्ट्रवादी'चे लोकसभेत ८ व राज्यसभेत १ असे नऊ खासदार आहेत. त्या आठ जणांनी एनडीएला पाठिंबा दिला तर ३२७ ही 'जादुई' संख्या सत्ताधारी गाठतील. राज्यसभेत २४५ जागा आहेत. पश्चिम बंगालमधील तीन जागांसाठी निवडणूक होत आहे. तृणमूल मधून आलेल्यांना भाजपने उमेदवारी दिल्याने ते तिघेही जिंकतील यात शंका नाही. राज्यसभेत दोन तृतीयांश बहुमतासाठी १६४ मतांची गरज आहे. 'एनडीए'कडे १५५ जण आहेत. जर राष्ट्रवादीच्या एकाने पाठिंबा दिला तर ती संख्या १५६ करणेही अवघड होईल.

द्रमुक 'इंडिया'ला साथ देणार की नाही? हेही पाहावे लागेल. संसदेत व बाहेर विरोधक शिल्लक राहू नयेत ही भाजपची इच्छा आहे. 'केसरी'ने या संदर्भात या स्तंभात भाष्य केले आहे ('दोन तृतीयांश'कडे-११ जून). त्यामुळेच आपण कोणाबरोबर आहोत हे राष्ट्रवादीने स्पष्ट केले पाहिजे.





# उपदेशकथा: समानता

एकदा महाराज अजितसिंह यांनी दरबारी लोकांसाठी एक नृत्याचा कार्यक्रम आयोजिला होता. स्वामी विवेकानंद त्यांचे पाहुणे असल्याने महाराजांनी त्यांनाही निमंत्रण पाठवले पण स्वामीजींनी त्यांना स्पष्ट नकार कळविला आणि आपण संन्यासी असल्याने अशा नाचगाण्याच्या कार्यक्रमांना आपण उपास्थित राहू शकत नाही, असे सांगितले. त्या नर्तकीला जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा तिला फार दु:ख झाले. स्वामीजींच्या नकाराला उत्तर म्हणून तिने सूरदासाचे एक भजन आळवण्यास प्रारंभ केला. **'प्रभू मेरो अवगुण चित न धरो : समदर्शी है नाम तिहारो, चाहे तो दूर करो।'** हे प्रभू आपण माझे अवगुण मनात ठेवू नका. आपण



सर्वांकडे समभावाने पाहणारे आहात! लोखंडाच्या एका तुकड्याची मूर्ती बनते तर दुसऱ्या तुकड्यापासून खाटकाचा सुरा बनतो पण परिसस्पर्श झाला की, त्या दोन्ही लोखंडाच्या तुकड्यांचे सोनेच बनते. तसंच हे देवा! आपण माझ्यातील दुर्गुणांकडे न बघता आ-तील माणसाकडे बघा! आर्तपणे आळवलेले हे सूरदासाचे भजन स्वामीजींच्या कानावर पडले तेव्हा त्यांचे अंत:करण हेलावले. ते स्वत:शीच म्हणाले, 'तू संन्यासी आहेस ना? सगळीकडे एकच एक ब्रह्म पाहतोस ना? मग त्या नर्तकीतल्या ब्रह्माला तू असं दूर का लोटतोस? सगळीकडे असणारं ब्रह्म तिच्यातही आहे! या विच-राशी ते दरबारात धावले आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांनी ते संपूर्ण भजन ऐकले. नंतर त्यांनी त्या नर्तकीला 'आई' असे संबोधून तिची क्षमा मागितली! या प्रसंगाने स्वामीजींच्या मनातील उरला सुरला भेदभावही नष्ट झाला . **कथा उपदेश :** जात-पात किंवा जन्मजात, उच्चनीचता मानू नये.

**फायबरयुक्त आहार:** अन्ना-तील न पचणारे धागे पोटात स्पंजसारखे काम करतात आणि मळाला मऊ करतात. ताजी फळे (उदा. पपई, पेरू, सफरचंद), हिरव्या पालेभाज्या आणि कडधान्ये रोज खा. पोळी किंवा



# बद्धकोष्टतेसाठी घरगुतीउपास

भाकरीच्या पिठात ज्वारी, बाजरी किंवा थोडा कोंडा मिसळा. रात्री झोपण्यापूर्वी १ चमचा 'इसबगोल' कोमट पाण्यातून घ्या. २. भरपूर पाणी प्या (जलद पचन):पाणी कमी प्यायल्यास शौच कडक होते. दिवसभरात कमीत कमी ८ ते १० ग्लास पाणी नक्की प्या. सकाळी उठल्यावर लगेच १ किंवा २ ग्लास कोमट पाणी प्या. **३. व्यायाम आणि हालचाल:** एकाच ठिकाणी जास्त वेळ बसून राहिल्याने पचनक्रिया मंदावते.रोज किमान ३० मिनिटे चाला. पोटाची हालचाल सुधारण्यासाठी योगासने करा. ४. आयुर्वेदिक उपाय: त्रिफळा चूर्ण: १ चमचा त्रिफळा चूर्ण रात्री झोपताना कोमट पाण्यासोबत घ्या. यामुळे पोट साफ होण्यास मदत होते. कोमट पाणी आणि लिंबू: एका ग्लास कोमट पाण्यात अर्धा लिंबू आणि १ चमचा मध मिसळून प्या. महत्त्वाची सूचना: जर तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास ३ आठवड्यांपेक्षा जास्त काळ जाणवत असेल, शौचाच्या वेळी रक्त पडत असेल किंवा पोटात असह्य वेदना होत असतील, तर लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# आदर्श

मग काय म्हणताय माझ्या बालमित्रांनो संपली का परिक्षा? सुट्टी लागली असेल आणि सुट्टीत काय काय करायचे कुठे कुठे जायचे याचे वेळापत्रकही तयार झाले असेल. कुणी सुट्टीला मामाकडे जाणार असेल तर कुणी आई बाबांबरोबर सह-लीला, कुणी वेगवेगळया शिबीरात भाग घेणार असेल तर कुणी पोहण्याचा क्लास लावला असेल. दिवसभर नुसती धमाल करत असाल नाही? आणि खरं सांगू का अशी धमाल तर करायलाच हवी सुट्टी. कारण वर्षभर तुम्ही शाळा, शिकवणी, अभ्यास आणि परिक्षा या सर्वांमध्ये इतके गुंतलेले असता की धमाल करु म्हटले तरी वेळ नसतो.

बालमित्रांनो आजपर्यंत तुम्ही आजी आजोबांकडून किंवा पुस्तकांतून बर्याच गोष्टी ऐकल्या व वाचल्या असतील आणि त्यातून काही शिकलाही असाल. तुम्ही तुमच्या अवतीभवती किंवा बागेत अनेक प्राणी, पक्षी आणि अजूनही खुप काही गोष्टी पाहता, पण त्या गोष्टीमधील महत्वाची वैशिष्टे घेण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केलाय का? तुम्ही आता या सुट्टीत मागच्या सुट्टीपेक्षा एक वर्षाने मोठे झालात आणि हेच पुढच्या सुट्टीत पण होणार मग मोठे झालात तरीपण छोटेपणातले धडे विसरायचे नाही हं! डीीूरआता हेच पहा तुम्ही सुर्य रोज पाहता पण याचा कधी विचार केला का की सुर्य ज्याप्रमाणे तेजस्वी राहून सर्वांना





प्रकाश देतो तसेच मी पण तेजस्वी बनण्याचा प्रयत्न करील. क्ष्ीींळतुम्ही हत्तीदादाला पाहता. त्याचे ते भले मोठे शरीर, सुपाएवढे कान आणि लांब अशी सोंड हे सर्व पाहता पण कधी त्याच्या इवल्याश्या डोळयातील तीक्ष्ण नजरेचा विचार केलाय का? तेव्हा मित्रांनो आपल्याला ह्या छोटयाश्या पण तीक्ष्ण अशा हत्तीदादाच्या दृष्टीचा आदर्श घ्यायचाय. डळपहरजंगलचा राजा सिंह. त्याचा तो रुबाब, एक डरकाळी फोडली तर जंगल हादरुन जाईन. त्याच्याकडून आपल्याला काय घेता येईल बरे? तर आपल्यामध्ये मोठी ताकद येण्यासाठी सिंहाच्या शरीरयष्टीचा आदर्श घ्यायचा. ऋह्रेवरअतिशय चपळ असा प्राणी म्हणजे घोडा. तुम्हाला काय वाटते याच्याकडे पाह्यल्यावर? याच्याकडून आपल्याला शिकता येणारी गोष्ट म्हणजे मोठी धाव घेण्यासाठी लागण-ारी बळकट टाप. मग घेणार ना ह्या बळकट टापेचा आदर्श धावायला? आकाराने मोठा असून सुध्दा आकाशात उंच उंच भरारी मारणारा पक्षी म्हणजे गरुड. आपल्याला यशस्वी व्हायचे असेल तर गरुडाचा आदर्श घेऊन त्याच्याकडून गगनभरारी घेण्यासाठी लागणारी झेप घ्यावी.

चींपसळमुंगी ही अतिशय छोटा प्राणी. साखरेचा एक दाणा मिळवण्यासाठी ती किती धडपड करते, किती अथक परिश्रम करते. मग साखर म्हणजे हवे ते मिळवायचे असेल तर मुंगीचा आदर्श घ्यायला काय बिघडते?

घहरीअसे म्हणतात राम रावण युध्दाच्यावेळी पुल बांधण्यासाठी खारुताईने छोटे छोटे खडे गोळा केले आणि तिच्या या कामाबद्दल रामाने तिच्या पाठीवरुन हात फिरवून शाबासकी दिली. त्याची खूण म्हणजे खारुताईच्या पाठीवर असलेल्या पाच रेषा ज्या रामाच्या बोटांनी उठल्या असे म्हणतात. मग चांगले काम करुन सर्वांना मदत करुन खारुताईच्या पाठीचा आदर्श घ्यायला काय हरकत आहे? कोकिळेला पाह्यल्यावर रंगाने काळा असलेला हा पक्षी त्याच्या कंठातून किती मधूर स्वर येतात. तसेच मधूर स्वर जर आपल्या कंठातून बाहेर पडले तर किती छान होईल. तेव्हा बालमित्रांनो ह्या सर्व गोष्टी पण तुम्ही ध्यानात घ्या आणि सुट्टीत जे जे काही पाहाल अनुभवाल त्यातून चांगल्या गोष्टी घेऊन पुढे चला आणि त्या नेहमी तुमच्या जवळ असू द्या. खुप खुप मजा करा आणि पुढच्या वर्षाचे हसत स्वागत करा.

- मनिषा नवले, पुणे

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



बदलत असलेली जीवनशैलीचा प्रभाव दांपत्य जीवनावर पडत आहे. हल्ली ताणावाच प्रभाव मॅरिड लाईफवर पडत असून अनेक दंपती बाळाला जन्म घालण्यास समर्थ ठरतं आहे. खानपान, रा-हणी आणि धावपळीच्या या काळात पुरुषांमध्ये नपुंसकत्व वाढत आहे. योग्य आहार आणि पोषणाची कमी या कारणामुळे पुरुषांची प्रजनन क्षमता प्रभावित होत आहे. अशात कमजोरीमुळे दांपत्य जीवनातील आनंद देखील हरवत आहे. तर आज जाणून घ्या नपुंसकत्वासाठी जवाबदार **५ खाद्य पदार्थांबद्दल:** **५ प्रोसेस्ड मीट-** मांस खाणार्या लोकांना माहीत असावे की प्रोसेस्ड मीट आपल्या स्पर्मच्या गुणवत्तेवर विपरित प्रभाव टाकतं. हॅमबर्गर, हॉट डॉग आणि इतर खाद्य पदार्थांमध्ये वापरण्यात येणारे प्रोसेस्ड मीट स्पर्म काउंट २३ टक्क्यांपर्यंत कमी करतं. प्रोसेस्ड मीटमध्ये प्रजनन तंत्राला नुकसान करणारे हार्मोनल अवशेष आढळतात.

## २ Joke विनोद




तुझं वय किती? बस कंडक्टरने छोट्या मुलीला विचारले.

ङ्गआठफ

ङ्गमग अर्धे तिकीटफ कंडक्टर म्हणाला.

मुलगी गोड हसली.

ङ्गतू बारा वर्षाची केव्हा होणार?फ कंडक्टरने विचारले.

ङ्गबसमधून उतरले की लगेच.फ

## ३ Message संदेश




Ek Survey se Maloom hua hai k..
Agar Patni “Karwa chauth” k vrat ki bajay...
“MAUN VRAT” rakhe
To Pati ki Umar aur lambi ho sakati hai...

## ४ Thought सुविचार




सभ्य माणसाचे लक्षण हे की तो दुसऱ्याला दुखवीत नसतो.
- कार्डिनल न्यूमन

**संस्कृत सुभाषित**

**अप्युन्मत्तात्प्रलपतो बालाच्च परिजल्पत:**
**सर्वत: सारमादद्यादश्मभ्य इव कांचनम ।।**
**(उद्योगपर्व, अध्याय ३४, ोक ३२, महाभारत)**

**अर्थ -** वेडाच्या लहरीत बरळणाऱ्या वेड्यापासून, बोबडे बोल बोलणाऱ्या बालकापासून, सर्वापासून, दगडांतून सोने निवडावे त्याप्रमाणे चांगले तेवढे ग्रहण करावे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. तिन्ही त्रिकाळ!
८. गोड
१०. नम्रतेने झुकलेला
११. रात्रीचा पाऊस
१२. स्थूल, भरपूर
१४. जोरदार बुक्का
१६. सुगंध पसरणे
१८. ठराविक ठसा
१९. युद्ध, लढाई
२१. उत्सव
२२. मारुतीचा वार
२५. खरकट्याचा ढीग
२७. एक तारवाद्य
३०. छोटी गाय
३२. अंतरिक्ष प्रवासी
३४. अधिक श्रेष्ठ, वरचढ
३६. संगीतातील ठेका
३७. नामघोष
३८. हात
३९. केस
४१. टक, दृष्टी
४३. विझवणे
४४. शिकारीचा प्राणी
४६. आईवडील
४७. रमापती
४८. उगीच
५१. च्या समक्ष, च्या देखत
५२. कापडाचा एक प्रकार
५३. ढाक्याचे प्रसिद्ध कापड
५५. धागे विणून कापड तयार करण्याचे साधन
५७. विकार
५८. सरसकट
६०. गाय
६१. भार
६३. सोन्याचा कस
६४. महाभारतातील खादाड राक्षस
६६. समुद्र
६७. कोल्हापूरची महालक्ष्मी
६९. केर
७१. जाडसर पीठ
७३. श्वासोच्छश्वास
७५. मध
७६. पुष्पदल
७७. दर्पण
७८. मेंढपाळ

## उभे शब्द

१. कायदेशीर
२. करंजीच्या कडा कापणारी
३. मर्यादा, सीमा
४. निमग्न, गुंग
५. संभाषणाने हा साधला जाईलच असे नाही!
६. तोंडी लावण्याचा पदार्थ
७. वेडावाकडा वाढणारा एक औषधी कंद
८. निर्बुद्ध
९. अतिरेक करून सांगणे (वाक्य प्रचार)
१२. गणपतीचे एक नाव
१३. अर्धांगवायू
१५. बैलाच्या गळ्यातील दोर
१७. सैन्याचा दाणागोटा
२०. जुगाराचा एक प्रकार
२३. फक्त, केवळ
२४. खोडण्याचे साधन
२६. मकर
२७. सूट
२८. अशक्त
२९. शहानिशा
३१. वेलींची बाग
३२. काजळ, सुरमा इ.
३३. शूर मुलाची आई
३४. जप्ती
३५. आवेशाने पुढे जाणे
३८. अगदी क्षुल्लक
४०. त्वरित
४२. उपवासाचा कंद
४५. नवरदेव
४८. त्वरित समर्पक उत्तर देणारा
४९. अनुत्तीर्ण
५०. बडबड, त्रास
५१. सारखा
५२. पतंगाचा धागा
५३. थडगे, कबर
५४. खोटा, तात्पुरता
५६. गाजावाजा
५७. नादिरा नायिका असलेला दिलीप कुमारचा चित्रपट
५९. एकदम, पटकन
६२. सोन्याचा धागा
६५. चंद्र
६६. वाहन हाकणारा
६८. परमेश्वर
७०. पालव
७२. छिद्र
७४. शुभ्र प्राणी
७५. नंतर

## आडवे उत्तर

१.सकाळ दुपार संध्याकाळ ८.मधुर १०.नत ११.रातवा १२.गलेलठ्ठ १४.दणका १६.दरवळणे १८.साचा १९.समर २१.सण २२.शनिवार २५.रमराट २७.सरोद ३०.कालवड ३२.अंतराळवीर ३४.सरस ३६.ताल ३७.गजर ३८.कर ३९.कुंतल ४१.नजर ४३.मालवणे ४४.सावज ४६.मातापिता ४७.रमावर ४८.हकनाक ५१.समोर ५२.मांजरपाट ५३.मलमल ५५.माग ५७.आजार ५८.सकटनिकट ६०.गो ६१.वजन ६३.टच ६४.बकासूर ६६.सागर ६७.अंबाबाई ६९.कचरा ७१.रवा ७३.श्वसन ७५.मकरंद ७६.पाकळी ७७.आरसा ७८.धनगर

## उभे उत्तर

१.सनदशीर २.कातण ३.पारावार ४.रत ५.संवाद ६.कालवण ७.ओले ८.मठ्ठ ९.रजाचा गज करणे १२.गणेश १३.लकवा १५.कासरा १७.रसद २०.मटका २३.निव्वळ २४.रबर २६.मगर २७.सवलत २८.रोड २९.खातरजमा ३१.लताकुंज ३२.अंजन ३३.वीरमाता ३४.सरकारजमा ३५.सरसावणे ३८.कवडीमोल ४०.लवकर ४२.रताळे ४५.वर ४८.हजरजबाबी ४९.नापास ५०.कटकट ५१.सम ५२.मांजा ५३.मकबरा ५४.लटका ५६.गवगवा ५७.आन ५९.टचकन ६२.जर ६५.सुधाकर ६६.सारथी ६८.ईश्वर ७०.पदर ७२.भोक ७४.ससा ७५.मग



# चंदेरी दुनिया

## कतरिनाने ३५० कोटींहून अधिक मूल्याचा सौंदर्य प्रसाधनांचा ब्रँड कसा बनवला?



चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री कतरिना कैफने हे सिद्ध केले आहे की तिचे यश केवळ अभिनय क्षेत्रापुरते मर्यादित नाही. कतरिना कैफने अवघ्या काही वर्षांत एक अत्यंत यशस्वी व्यापारी नाव (ब्रँड) उभारले आहे, ज्याची एकूण विक्री ३५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. तिने २०११ मध्ये भारतातील सर्वात मोठ्या सौंदर्य प्रसाधने विक्रेत्या 'नायका' सोबत भागीदारी केली आणि 'काय ब्युटी' नावाचा स्वतः चा सौंदर्य प्रसाधनांचा ब्रँड बाजारात आणला. सुरुवातीला लोकांना असे वाटले की हा व्यापार केवळ अभिनेत्रीच्या नावामुळे प्रसिद्ध झाला आहे, परंतु अवघ्या काही वर्षांतच याची गणना भारता-तील सर्वात यशस्वी सौंदर्य प्रसाधनांमध्ये होऊ लागली. ताज्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कतरिना कैफच्या उत्पादनांची एकूण विक्री ३५० कोटी रुपयांवर पोहोचली आहे, जी मागील वर्षाच्या तुलनेत जवळपास ४६ टक्के अधिक आहे. अभिनेत्रीने आपल्या या व्यापाराची व्याप्ती भारताव्यतिरिक्त ब्रिटन आणि मध्य पूर्व देशांच्या बाजारपेठांमध्येही वाढवली आहे आणि तिथेही या उत्पादनांना मोठी पसंती मिळाली आहे. तज्ज्ञांच्या मते, कतरिना कैफच्या या यशाचे कारण हे आहे की, तिने केवळ आपल्या प्रसिद्ध नावाचा वापर केला नाही, तर उत्पादनांची निर्मिती, गुणवत्ता आणि किमतींवरही विशेष लक्ष दिले. ही उत्पादने विशेषतः या भागातील हवामान आणि त्वचेचा रंग लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहेत. त्यांच्या जाहिरातींसाठी पारंपारिक माध्यमांसोबतच सामाजिक माध्यमे आणि प्रभावशाली व्यक्तींच्या ताकदीचाही पुरेपूर वापर करण्यात आला, तसेच महागड्या आंतरराष्ट्रीय उत्पादनांच्या तुलनेत किमतीही वाजवी ठेवण्यात आल्या. अभिनेत्रीने उत्पादनांच्या वितरणासाठी प्रसिद्ध सौंदर्य प्रसाधने विक्रेत्या 'नायका'सोबत भागीदारी केली, ज्यामुळे तिला आपली उत्पादने करोडो ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यास मदत झाली.

## विचार करतोय सर्वांना माझ्या आईचा नंबर देऊन टाकू

### लग्नाच्या अफवांवर रचित संगीची प्रतिक्रिया



अभिनेता रचित संगीने इशा क्रेशीसोबतच्या त्याच्या लग्नाच्या आणि लग्नाची तारीख ठरल्याच्या अफवांवर मौन सोडले आहे. तो म्हणाला की, आता विचार करतोय सर्वांना माझ्या आईचा नंबर देऊन टाकू. आपला अलीकडचा चित्रपट 'बेबे डू डाय डू' च्या यशाचा आनंद साजरा करणारा अभिनेता रचित संगी सध्या त्याच्या चित्रपटापेक्षा लग्नाच्या अफवांमुळे जास्त चर्चेत आहे. सामाजिक माध्यमांवर अशा अफवा पसरल्या आहेत की, तो या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात त्याची जवळची मैत्रीण आणि सह-अभिनेत्री इशा क्रेशीसोबत विवाहबंधनात अडकणार आहे. इशा क्रेशी आणि रचित संगी यांच्यातील संबंधांच्या बातम्यांना तेव्हा अधिक हवा मिळाली, जेव्हा दोघे एका विवाह समारंभात एकत्र दिसले होते. त्यानंतर दोघांच्या सार्वजनिक ठिकाणांवरील सततच्या भेटीगाठींनी या अफवांना अधिक खतपाणी घातले, इतकेच नाही तर प्रसारमाध्यमांमध्ये त्यांच्या ऑक्टोबर २०२६ मधील लग्नाच्या तारखांचाही उल्लेख होऊ लागला. एका मुलाखतीदरम्यान जेव्हा रचित संगीला या कथित लग्नाच्या सत्याबद्दल विचारण्यात आले, तेव्हा तो खळखळून हसला आणि म्हणाला, माहीत नाही कोण, कुठून माझे लग्न लावून देत आहे. मी तर आता विचार करतोय की सर्वांना माझ्या आईचा नंबर देऊन टाकावा, कारण सगळे लोक मला दूरध्वनी करून हेच विचारत आहेत. लग्नाबाबत स्पष्ट शब्दांत सांगताना तो म्हणाला, असे काहीही घडत नाहीये. तसेच भविष्यात जेव्हा कधी त्याच्या आयुष्यात असा मोठा प्रसंग येईल, तेव्हा तो स्वतः सर्वांना याबद्दल नक्की सांगेल, असे आश्वासनही त्याने हसतमुखाने चाहत्यांना दिले.



## आर्थिक चणचणीने कमी वयातच समजूतदार बनवले; विजय सेतुपती



अभिनेता विजय सेतुपतीची गणना आजच्या काळातील चित्रपटसृष्टीतील अत्यंत अष्टपैलू अभिनेत्यांमध्ये केली जाते. तमिळ चित्रपटसृष्टीतील या नामांकित अभिनेत्याने व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी आणि समीक्षकांनी कौतुक केलेल्या चित्रपटांमध्ये उत्तम समतोल राखत एक यशस्वी कारकीर्द घडवली आहे. ४९ वर्षीय विजयचे म्हणणे आहे की, चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय अभिनेत्यांमध्ये सामील होण्यापूर्वी त्यांचे आयुष्य तीव्र आर्थिक अडचणींमधून गेले, ज्याचा त्यांच्या कुटुंबाच्या प्रत्येक निर्णयावर खोल परिणाम झाला.

नुकतेच एका श्राव्य-संवादात (पॉडकास्ट) बोलताना विजयने आपल्या लहानपणीच्या दिवसांची आठवण काढली आणि सांगितले की, आर्थिक चणचणीत संगोपन झाल्यामुळे तो कमी वयातच समजूतदार झाला होता. गरिबी हा त्याच्या सुरुवातीच्या आयुष्याचा एक स्थायी भाग होता आणि त्यांचे कुटुंब कोणत्या गोष्टीची इच्छा करू शकते किंवा काय खरेदी करू शकते, हे त्यांची आर्थिक स्थितीच ठरवायची. त्या दिवसांची आठवण काढतील विजय म्हणाला, लहानपणी मी जास्त करून आर्थिक अडचणीच पाहिल्या. लोक म्हणतात की तारुण्य हे गरिबी आणि त्रासांनी भरलेले असते, पण मी लहानपणापासूनच या परिस्थितीचा अनेकदा सामना केला आहे.

त्याने पुढे सांगितले की, जेव्हा कर्ज देणारे घरी यायचे किंवा येऊन बसायचे, तेव्हा मीच माझ्या वडिलांसोबत बसायचो आणि हे व्यवहार सांभाळायचो. विजयने हा देखील खुलासा केला की, अभिनय हा कधीच त्याच्या सुरुवातीच्या योजनांचा भाग नव्हता. त्याऐवजी, त्याला नेहमी स्वतः ला एक व्यावसायिक म्हणून पाहायचे होते. तो म्हणाला, जेव्हा मी शाळेत होतो, तेव्हा रोजंदारीवर काम करायला जायचो. त्यानंतर मी एका दूरध्वनी केंद्रावरही काम केले. मी माझ्या आयुष्यात रात्री काम करताना अनेक दरवाजे ठोठावले आहेत.विजय सेतुपतीने आपल्या अभिनय प्रवासाची सुरुवात छोट्या आणि सहाय्यक भूमिकांमधून केली, ज्यानंतर २०१२ मध्ये मपिझ्झाफ आणि मनदुवला कोंजम पक्काथा कानोमम या चित्रपटांमधून त्याला मोठे यश मिळाले. त्याने मसूधू काव्वमम, मविक्रम वेधाफ, म९६फ, मसुपर डिलक्सफ, ममास्टरफ, मविक्रमम, मजवानफ आणि ममहार-ाजाफ यांसारख्या चित्रपटांद्वारे चित्रपटसृष्टीमध्ये आपली ओळख मजबूत केली. मुख्य भूमिकांसोबतच संस्मरणीय सहाय्यक भूमिका साकारण्याच्या त्याच्या क्षमतेने त्याला विविध भाषांतील चित्रपटसृष्टीत प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली आहे. विजय शेवटचा २०२६ मधील मगांधी टॉक्सफ या चित्रपटात दिसला होता. त्याचे काही नवीन प्रकल्प नियोजित आहेत, ज्यामध्ये मस्लमडॉग ३३ टेम्पल रोडफ चा समावेश आहे, ज्याची निर्मिती पुरी जगन्नाथ करत आहेत आणि यात तबू, संयुक्ता आणि दुनिया विजय हे देखील सह-कलाकार आहेत.





## अभिनेत्री शेहनाज गिलने राघव जुयालसोबतच्या प्रेमसंबंधांच्या अफवांवर मौन सोडले

अभिनेत्री शेहनाज गिलने राघव जुयालसोबतच्या प्रेमसंबंधांच्या (डेटिंगच्या) अफवांवर अखेर आपले मौन सोडले आहे. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, गेल्या आठवड्यात हे दोन्ही कलाकार एका वाढदिवसाच्या सोहळ्यात सहभागी झाले होते. या सोहळ्यानंतर राघव शेहनाजला गर्दीतून वाचवून गाडीकडे घेऊन जाताना दिसला होता, ज्याचा चित्रफिती (व्हिडिओ) सामाजिक माध्यमांवर (सोशल मीडियावर) मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला होता. ही चित्रफिती प्रसारित झाल्यानंतर या दोन्ही कलाकारांच्या प्रेमसंबंधांच्या चर्चांना उधाण आले होते.

नुकतीच शेहनाज गिलने एक मुलाखत दिली, ज्यामध्ये तिला राघवसोबतच्या प्रेमसंबंधांविषयी प्रश्न विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना अभिनेत्री म्हणाली की, राघव माझा खूप चांगला मित्र आहे, कृपया वैयक्तिक प्रश्न विचारू नका. यासोबतच शेहनाज गिलने प्रश्नाची दिशा बदलत चाहत्यांना संबोधित केले आणि म्हटले की, माझ्या मित्राचा चित्रपट येत आहे, तुम्ही सर्वांनी कृपया त्याला पाठिंबा द्या. तो माझा खूप चांगला मित्र आहे आणि त्याचा चित्रपट यशस्वी होणे खूप गरजेचे आहे. तो नायक म्हणून पहिल्यांदाच पडद्यावर येत आहे, त्याचा चित्रपटसृष्टीशी कोणताही संबंध नाही आणि तो स्वतःच्या मेहनतीने इथपर्यंत पोहोचला आहे. उल्लेखनीय आहे की, शेहनाज गिल आणि राघव जुयाल २०२३ मध्ये आलेल्या सलमान खानच्या एका चित्रपटात एकत्र दिसले होते.

## सतत चित्रफिती बनवल्यामुळे मौनी रॉय प्रचंड भडकली



चित्रपट आणि दूरचित्रवाणी वाहिनीवरील अभिनेत्री मौनी रॉय काल मुंबईतील वांद्रे भागा-तील एका उपहारगृहातून (हॉटेलमधून) बाहेर पडली, तेव्हा छायाचित्रकार (पॅपाराझी) सतत तिच्या गाडीजवळ येऊन तिची चित्रफिती बनवत होते. यावर मौनी रॉयने तीव्र नाराजी व्यक्त करत अत्यंत कडक शब्दांत हे बंद करा असे सुनावले. माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, ४१ वर्षीय मौनी रॉय तिची मैत्रीण अनुषा दांडेकरसोबत एका उपहारगृहातून बाहेर पडली, तेव्हा छायाचित्रकारांनी तिची चित्रफिती बनवण्यास सुरुवात केली. या प्रसंगाची एक चित्रफिती सामाजिक माध्यमांवर वेगाने प्रसारित होत आहे, ज्यामध्ये मौनी स्पष्टपणे नाराज दिसत आहे. ती गाडीत बसल्यानंतरही छायाचित्रकार सतत चित्रफिती बनवत आणि छायाचित्रे काढत राहिले. अखेर मौनीने संतापून छायाचित्रकारांना मुद्रण (रेकॉर्डिंग) बंद करण्यास सांगितले. या चित्रफितीमध्ये मौनी उपहारगृहातून बाहेर पडताना दिसत आहे, जिथे छायाचित्रकारांनी तिला वेढले होते. सुरुवातीला तिने कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही, परंतु सततच्या चित्रफितीमुळे ती संतापली आणि गाडीत बसल्यानंतरही चित्रफिती बनवल्यामुळे छायाचित्रकारांवर ओरडली. तिची मैत्रीण अन-ुषाने परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला, छायाचित्रकारांना चित्रफिती थांबवण्याचा इश-ारा केला आणि मौनीला शांत करतानाही ती दिसली. मौनीच्या कामाबद्दल सांगायचे तर, ती शेवटी एका चित्रपटात दिसली होती, ज्यामध्ये वरुण धवन, पूजा हेगडे आणि मृणाल ठाकूर हे देखील होते. मात्र, हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कमाई करू शकला नाही.

## सोनाक्षी आणि झहीरच्या नात्याबद्दल सलमान ने वर्तवले होते आश्चर्यकारक भाकीत

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि तिचा पती झहीर इक्बाल यांनी खुलासा केला आहे की, सलमान खानने त्यांच्यातील प्रेमसंबंधांचा अंदाज तेव्हाच लावला होता, जेव्हा त्यांनी स्वतः देखील एकमेकांसमोर याची कबुली दिली नव्ह-ती. हे दोघे नुकतेच एका कार्यक्रमात सहभागी झाले होते, जिथे त्यांनी आपल्या नात्याबद्दलच्या काही रंजक आठवणी सामायिक केल्या. सोनाक्षी सिन्हाने सांगितले की, सलमान खान-ने त्यांची पहिली भेट त्याच्या एका मेजव-ानीत (पार्टीमध्ये) करून दिली होती आणि तो आमच्यातील वाढती जवळीक चांगल्या प्रकारे ओळखत होता. अभिनेत्रीच्या मते, आमच्यात सर्व काही स्पष्ट होते आणि सलमान खान इतके साधे नाहीत की त्यांना काही समजणार नाही. जेव्हा जेव्हा ते मला विचारायचे, तेव्हा मी नेहमी असे काही नाही, असेच सांगायचे. सोनाक्षीने पुढे सांगितले की, एक दिवस सलमान खानने मला बोलावले आणि सांगितले की, हे बघ, एक दिवस तुम्हा दोघांचे ब्रेकअप होईल (नातं तुटेल), तू इथे येऊन रडशील आणि तो तिथे जाऊन रडेल. मी तुम्हा दोघांवर प्रेम करतो, म्हणूनच मला कोणाची एक बाजू घ्यायची नाही. अभिनेत्री म्हणाली की, सलमान खानचे हे बोलणे ऐकून आम्ही दोघेही थक्क झालो कारण त्यांनी आमच्या नात्याचा अंदाज आधीच लावला होता. झहीर इक्बालनेही या गोष्टीला दुजोरा देत म्हटले की, आम्ही त्यांना काहीही सांगितले नव्हते.तरीही सलमान खानला आधीच सर्व काही ठाऊक हो-

## झेंडायाच्या ३००० वर्षे जुन्या इराणी सोन्याच्या दागिन्यांवरून वाद सुरू

अभिनेत्री झेंडायाने लंडनमधील एका प्रसिद्धी सोहळ्यादरम्यान ३ हजार वर्षे जुने इराणी सोन्याचे दुर्मिळ दागिने परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मात्र, तिच्या या निवडीवर सामाजिक माध्यमांवर संमिश्र आणि वादग्रस्त प्रतिक्रिया उमटत आहेत. झेंडायाने पांढऱ्या रंगाचा एक विशेष पोशाख परिधान केला होता, ज्यासोबत तिने इराणी सुवर्ण खजिन्याशी संबंधित सोन्याच्या प्राचीन पट्ट्यांनी बनलेले दागिने घातले होते. आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, हे दागिने इसवी सन पूर्व १ हजार वर्षांपूर्वीच्या खऱ्या सोन्यापासून बनवले आहेत, जे नंतर १८ कॅरेट सोने आणि हिऱ्यांच्या साहाय्याने नव्या रूपात तयार करण्यात आले. या प्राचीन सोन्याच्या पट्ट्यांवर सूर्यकिरणांची आकृती कोरलेली आहे, जी प्राचीन काळातील प्रमुख पुरातत्व शास्त्रज्ञांच्या अनुपस्थितीमुळे अनेक वस्तूंची तोडफोड झाली आणि त्या वेगवेगळ्या खरेदीदारांना विकल्या गेल्या. त्यानंतर फ्रेंच पुरातत्व शास्त्रज्ञ आंद्रे गोदार यांनी १९४८ मध्ये पॅरिसमध्ये या वस्तूंचे प्रदर्शन भरवले होते, तर आणखी एक पुरातत्व शास्त्रज्ञ रोमन घिरशमन यांनी या खजिन्याशी संबंधित ६०० हून अधिक वस्तूंचे दस्तऐवजीकरण केले. आज या खजिन्यातील प्राचीन वस्तू जगातील मोठ्या संग्रहालयांमध्ये आणि खाजगी संग्रहांमध्ये सुरक्षित आहेत. या सोहळ्यानंतर सामाजिक माध्यमांवर काही युजर्सनी झेंडायाच्या या निवडीला ऐतिहासिक वारसा जगासमोर आणण्याचा प्रयत्न म्हटले, तर समीक्षकांनी प्रश्न उपस्थित केला की, दुसऱ्या देशाचा सांस्कृतिक वारसा फॅशन म्हणून वापरणे नैतिकदृष्ट्या योग्य आहे



चिन्हांमध्ये मानली जाते. प्राचीन संस्कृतीत हे चिन्ह सूर्यदेव 'शमाश'चे प्रतिनिधित्व करत असे, ज्याला न्याय, शक्ती आणि संरक्षणाचे प्रतीक मानले जात होते. तज्ज्ञांच्या मते, हा सुवर्ण खजिना १९४७ मध्ये इराणच्या कुर्दिस्तान प्रांतातील सखखेझ जवळील 'झिवियें' नावाच्या गावात सापडला होता, जिथे एका कांस्य शवपेटीतून सोन्याच्या शेकडो प्राचीन वस्तू हस्तगत करण्यात आल्या होत्या.

का? इस्लामिक इतिहास, कला आणि स्थापत्यशास्त्राचे अभ्यासक आणि लेखक जरार अली यांनी या प्रकरणी म्हटले आहे की, पाश्चात्य व्यक्ती अनेकदा जागतिक ऐतिहासिक आणि नैतिक बाबींकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या मते, दुसऱ्या देशांच्या प्राचीन वस्तूंचा दागिने म्हणून वापर करणे हे काही वेळा सांस्कृतिक वर्चस्व आणि मालकी हक्क दाखवण्याचा प्रकार म्हणून पाहिले जाऊ शकते.

## लातूरमध्ये २१ जुलै रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**लातूर/प्रतिनिधी:** केंद्र शासनाच्या नॅशनल करिअर सर्व्हिस प्रकल्पाच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २१ जुलै, २०२६ रोजी सकाळी १० वाजता औसा रोडवरील जिल्हा क्रीडा संकुल परिसरात असलेल्या शासकीय तंत्र प्रशाला केंद्रात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात अनेक नामांकित आस्थापना आणि खाजगी क्षेत्रातील उद्योजक सहभागी होऊन उमेदवारांच्या थेट मुलाखती घेणार असून यामध्ये दहावी, बारावी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण, कोणत्याही शाखेचे पदवीधर व पदव्युत्तर पदवीधारक, तसेच आय.टी.आय. आणि डिप्लोमा उत्तीर्ण अशा विविध शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या संधीचा लाभ घेण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींनी आणि नोकरी इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी येताना आपली सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा अद्ययावत रिझ्युम किंवा बायोडाटा आणि पासपोर्ट आकाराचे फोटो यांच्या प्रत्येकी तीन प्रतींसह निश्चित केलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे. तसेच या रोजगार मेळाव्याच्या आयोजनाबाबत उमेदवारांना काही अडचण किंवा शंका असल्यास अधिक माहितीसाठी कार्यालयातील प्रतिनिधी दत्तात्रय कांबळे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२३८४६५), लहू भंडारे (भ्रमणध्वनी क्र. ८०५५९९२९००) अथवा प्रवीण वाघमारे (भ्रमणध्वनी क्र. ९९२२९२५८९५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्करुग्ण उपचारासाठी महाकेअरच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उपचार व संशोधन सुविधा निर्माण कराव्यात - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### महाकेअर अंतर्गत नागपूरमध्ये 'नागपूर हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रोजेक्ट' उपकंपनी स्थापन करणार




**महाकेअरची व्याप्ती**

- महाकेअर कंपनीमार्फत विकेंद्रीत सेवा प्रणालीद्वारे कर्करोग उपचार पद्धतीत परिवर्तन होणार आहे.
- याअंतर्गत टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे सर्वोच्च संशोधन व कर्करोग उपचार केंद्र,
- मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नांदेड, कोल्हापूर, चंद्रपूर, नाशिक व अमरावती येथे जिल्हास्तरीय सर्वसमावेश कर्करोग उपचार केंद्रे
- मुंबई (कामा आल्ब्लेस), रत्नागिरी, सातारा, बारामती, जळगाव, यवतमाळ, अंबाजोगाई (बीड), ठाणे व शिर्डी येथे निदान व डे-केअर केंद्रांची उभारणी
- महाआरोग्य प्रकल्प माध्यमातून राज्यव्यापी अंमलबजावणी

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील कर्करोग रुग्णांवर उपचारासाठी महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन कंपनी (महाकेअर)च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उपचार व संशोधन सुविधा निर्माण कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन कंपनी संचालक मंडळाची पहिली बैठक सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, सचिव विकासचंद्र रस्तोगी, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव निपुण विनायक, वैद्यकीय शिक्षण सचिव धीरज कुमार, आरोग्य आयुक्त संजय काटकर, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय चंदनवाले, मानद सल्लागार व सदस्य डॉ. कैलाश शर्मा, नवीन खत्री, उपसचिव तथा सदस्य संदीप ढाकणे आदी उपस्थित होते. आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि राज्य-शासित एल २ व एल ३ कर्करोग रुग्णालयांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तीला निदानापासून उपचारापर्यंत समान व जागतिक दर्जाची कर्करोग सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाकेअर कंपनीची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. त्या माध्यमातून राज्यातील कर्करुग्णांची संख्या कमी करण्यात येणार आहे. त्यामुळे महाकेअरसाठी मनुष्यबळ उभारताना उच्च दर्जाची क्षमता असलेले मनुष्यबळ घ्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

महाकेअर अंतर्गत नागपूमध्ये 'नागपूर हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रोजेक्ट' या उपकंपनीची स्थापना करण्यास यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली. महाकेअर कंपनीच्या कॉर्पस निधीसाठी १०० कोटी रुपये महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच सामाजिक उत्तरदायित्व निधी उभारण्यास व स्वीकारणे, महाकेअरच्या कार्यालयासाठी जी.टी. रुग्णालय येथील इमारतीत जागा उपलब्ध करून देणे, कंपनीचे लेखापरीक्षक व कंपनी सचिवांची नियुक्ती करणे, सल्लागार नेमणे आदी विषयांनाही संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ऑटोमिक एनर्जीची पूर्व मान्यता घेण्याची आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

यावेळी टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलबरोबर तांत्रिक सहकार्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. टाटा मेमोरियलचे खत्री व महाकेअरचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंदनवाले यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

## दिव्यांग सशक्तीकरणासाठीच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी** : भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाच्या वतीने दिले जाणारे 'दिव्यांग सशक्तीकरण राष्ट्रीय पुरस्कार-२०२६' जाहीर करण्यात आले असून या राष्ट्रीय पुरस्कारांतर्गत प्रामुख्याने 'सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन', 'श्रेष्ठ दिव्यांगजन' आणि 'श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बाल/बालिका' या तीन श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याने लातूर जिल्ह्यातील पात्र दिव्यांग व्यक्ती, संस्था, स्वयंसेवी संस्था, नियोक्ते आणि कर्मचाऱ्यांनी आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

या पुरस्कारासाठी अर्ज करताना संबंधित दिव्यांग व्यक्तीने किंवा संस्थेने केलेल्या उल्लेखनीय, नाविन्यपूर्ण व प्रेरणादायी कार्याची सविस्तर माहिती पुराव्यांसह नमूद करणे आवश्यक आहे. त्यासोबत यु.डी.आय.डी. कार्ड किंवा अधिकृत दिव्यांग प्रमाणपत्र पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य आहे. तसेच या राष्ट्रीय पुरस्कारासाठी केवळ ऑनलाईन माध्यमातून केलेले अर्जच विचारात घेतले जाणार असून हस्तलिखित, टपाल अथवा इतर कोणत्याही भौतिक स्वरूपात प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नसल्याने लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र घटकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपले अर्ज वेळेत सादर करावेत, असेही जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# आषाढी वारी २०२६ : पंढरपूरसाठी सोलापूर विभागातून आणखी ६ विशेष रेल्वे गाड्या नागरसोल, आदिलाबाद आणि अकोला येथून वारकऱ्यांसाठी विशेष सुविधा




**सोलापूर/प्रतिनिधी:** आषाढी वारी २०२६ निमित्त पंढरपूर येथे येणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वेने यापूर्वी ७२ विशेष गाड्यांची घोषणा केली होती. आता त्यात आणखी ६ आषाढी विशेष गाड्यांची भर घालण्यात आली आहे. या विशेष गाड्या नागरसोल, आदिलाबाद आणि अकोला येथून पंढरपूरमार्गे धावणार असून, सर्व गाड्या सोलापूर विभागातील विविध स्थानकांवरून प्रवाशांना सेवा देणार आहेत.

नागरसोल-पंढरपूर-जालना विशेष (२ फेऱ्या) गाडी क्र. ०७६३१ नागरसोल येथून २४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता सुटून २५ जुलै रोजी दुपारी १२.५० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०७६३२ पंढरपूर येथून २५ जुलै रोजी रात्री ८.०० वाजता सुटून २६ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता जालना येथे पोहोचेल.

ही गाडी रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मनवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, हरंगुळ, मुरूड, ढोकी, कळंब रोड, येडशी, धाराशिव, पांगरी, बार्शी टाउन, शेंद्री, कुर्डुवाडी आणि मोडनिंब येथे थांबेल.

या गाडीमध्ये ४ वातानुकूलित तृतीय श्रेणी, १४ शयनयान, ६ सामान्य द्वितीय श्रेणी (२ गार्ड-ब्रेक व्हॅनसह) असे एकूण २४ डबे असतील.

आदिलाबाद-मिरज विशेष (२ फेऱ्या) गाडी क्र. ०७६३३ आदिलाबाद येथून २४ जुलै रोजी सकाळी ५.०० वाजता सुटून त्याच दिवशी रात्री ११.५५ वाजता मिरज येथे पोहोचेल. पंढरपूर येथे रात्री ९.४० ते ९.५० या वेळेत थांबा असेल. गाडी क्र. ०७६३४ मिरज येथून २५ जुलै रोजी रात्री ९.३० वाजता सुटून २६ जुलै रोजी दुपारी ३.०० वाजता आदिलाबाद येथे पोहोचेल. पंढरपूर येथे रात्री ११.४० ते ११.५० या वेळेत थांबा असेल.

ही गाडी किनवट, बोधाडी बुजुर्ग, सहस्त्रकुंड, हिमायतनगर, भोकर, मुदखेड, नांदेड, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, हरंगुळ, धाराशिव, पांगरी, बार्शी टाउन, कुर्डुवाडी, मोडनिंब, पंढरपूर, सांगोला, जठ रोड, कवठे महांकाळ आणि आरग येथे थांबेल.

या गाडीमध्ये १ वातानुकूलित तृतीय श्रेणी, २ शयनयान, २१ सामान्य द्वितीय श्रेणी (२ गार्ड-ब्रेक व्हॅनसह) असे २४ डबे असतील.

अकोला-पंढरपूर विशेष (२ फेऱ्या) गाडी क्र. ०७६३५ अकोला येथून २४ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता सुटून २५ जुलै रोजी सकाळी ९.२० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. गाडी क्र. ०७६३६ पंढरपूर येथून २५ जुलै रोजी दुपारी ३.५० वाजता सुटून २६ जुलै रोजी सायंकाळी ४.५० वाजता अकोला येथे पोहोचेल.

ही गाडी वाशीम, हिंगोली, बसमत, पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, पांगाव, लातूर रोड, उदगीर, भालकी, बिदर, झहीराबाद, विकाराबाद, तांडूर, सेरम, चित्तापूर, वाडी, कलबुर्गी, सोलापूर, कुर्डुवाडी आणि मोडनिंब येथे थांबेल.

या गाडीमध्ये १८ शयनयान व ४ सामान्य द्वितीय श्रेणी (२ गार्ड-ब्रेक व्हॅनसह) असे २२ डबे असतील.

**आरक्षणाची सुविधा**

या विशेष गाड्यांसाठी विशेष शुल्कासह आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच खठउढउ संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अनारक्षित डब्यांसाठी तिकिटे रेल्वे स्थानकांवरील बुकिंग काउंटर तसेच RailOne अॅपद्वारे उपलब्ध होतील.

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना वैध तिकीटासह प्रवास करण्याचे आवाहन केले असून, गाड्यांच्या सविस्तर वेळापत्रकासाठी छढएड, ठरळश्रजपश अॅप किंवा राष्ट्रीय रेल्वे चौकशी संकेतस्थळ पाहण्याचे आवाहन केले आहे.

## दिग्रस, रुधा व रावणकोळ गावात स्मार्ट मीटरची जनजागृती



**स्मार्ट मीटर ही डीजीटल युगाची गरज असून वीजगाहकांना स्मार्ट मीटर मुळे रियल टाईम वीजवापर कळतो व ग्राहकांना वीजवापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. रिडींग मध्ये होणारा मानवी हस्तक्षेप टाळून नेमके वीजवापराचे बील दिले जाते. मीटर मध्ये छेडछाड करून होणारी वीजचोरीही तत्काळ सर्व्हरला कळत असल्यामुळे वीजगळतीवरती नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. तसेच सौरऊर्जा वापरकर्त्यांना टीओडी सवलतीचा लाभ देत प्रति युनीट ८५ पैसे सवलतीचा लाभ घेता येणार आहे.**

**- धनंजय पवार, जनसंपर्क अधिकारी महावितरण**

**उदगीर/प्रतिनिधी** : स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या शंका दूर करण्यासाठी व जनजागृतीसाठी महावितरणच्या उदगीर विभागांतर्गत आयोजीत ग्राहक समाधान गृहभेटीस दिग्रस, रूधा, करडखेळ, हेर व रावणकोळ गावातील वीजग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यात सहाय्यक अभियंत्यांनी स्वत: हजेरी लावत ग्राहकांच्या शंकांचे निरसन केले.

लातूर मंडलाचे अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी तसेच उदगीर विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र महाव्दार यांच्या सुचनेनुसार ग्राहकांच्या स्मार्ट मीटर बाबत शंकांचे निरसन करण्याकरिता आता उपविभागीय स्तरावरील मेळाव्यासोबतच प्रत्यक्ष गावामध्ये जावून ग्रामस्थांच्या गृहभेटी घेत स्मार्ट मीटर विषयी केला जाणाऱ्या अपप्रचाराचे खंडण करित स्मार्ट मीटरचे कार्य, त्याचे फायदे, पारदर्शक वीज वापर नोंद, अचूक बिलिंग आणि ग्राहकांसह महावितरणच्या हिताच्या दृष्टीने स्मार्ट मीटरचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले. यावेळी ग्राहकांच्या वीज बिलासंदर्भातील शंका व तक्रारी ऐकून त्यांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. तसेच भविष्यात कोणत्याही ग्राहकाला चुकीचे किंवा अवास्तव वीज बिल आल्यास महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तत्परतेने मदत करतील, अशी हमी देण्यात आली. याशिवाय उपविभागीय कार्यालयात ग्राहक तक्रार निवारणाचे कार्य सातत्याने केले जाते, अशी माहितीही उपस्थितांना देण्यात आली. याप्रसंगी उपकार्यकारी अभियंता विनायक ढवळे, कनिष्ठ अभियंता सुमीत साबळे, शैलेश सुर्यवंशी व मयूर पाचपुते यांनी परिश्रम घेतले.

महावितरणच्या या संवादात्मक व सकारात्मक भूमिकेमुळे ग्रामीण भागातील वीजग्राहकांच्या शंकांचे समाधान होत असून, स्मार्ट मीटर बसविण्यास सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे.

# देवेंद्र फडणवीस हे शेतकऱ्यांच्या सुखदु:खात पाठीशी उभे असणारे एकमेव नेतृत्व - भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे प्रतिपादन




**लातूर/प्रतिनिधी** :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व शेतकऱ्यांसह प्रत्येक नागरिकाच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा यासाठी गावागावातील शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांचे स्वप्न पूर्ण करणारे एकमेव नेतृत्व आहे. त्यामुळे राज्यातील तमाम शेतकरीवर्ग पूर्ण ताकदीनिशी देवाभाऊ सरकारच्या पाठीशी उभे आहे असे प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी केले. पीक कर्जमुक्तीचा निर्णय घेतल्याबद्दल राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने भाजप किसान मोर्चाने मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार सोहळा पार पडला. याप्रसंगी श्री. रविंद्र चव्हाण यांनी सभागृहाला संबोधित केले.

शेतरस्ते आणि पाणंद रस्ते, जलयुक्त शिवार अभियान, शेतीला मिळालेली -ख आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड, कृषी पंपांना भर दिवसा मोफत वीज अशा फडणवीस यांच्या नेतृत्वात घेण्यात आलेल्या विविध निर्णय आणि योजनांचा यावेळी श्री. रविंद्र चव्हाण यांनी मागोवा घेतला. सरकारच्या कामगिरीतून शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या सोहळ्यादरम्यान भाजप प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे यांनी राज्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी हात उंचावून आणि देवाभाऊ यांच्या नावाने जयघोष केला. या सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सोहळ्याकडे केवळ एक सत्कार सोहळा म्हणून न पाहता शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची सुवर्णसंधी म्हणून पाहत असल्याचे नमूद केले.

तसेच कोणतीही राजकीय निवडणूक डोळ्यांसमोर नसताना आम्ही कर्जमुक्तीचा निर्णय घेतला, कारण शेतकऱ्यांचे हित हा आमच्यासाठी राजकारणाचा विषय नाही. अनेकांना वाटत होतं सरकार कर्जमाफी करणार नाही. आपण आंदोलने करू... पण हे महायुतीचे सरकार आहे, शेतकऱ्यांच्या देवाभाऊचे सरकार आहे असंही ते म्हणाले. ७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या कृषी पंपांना भर दिवसा आणि मोफत वीज देण्यात येत आहे. या पंपांसाठी असणारे ४८ हजार कोटींचे जुने वीज बिल माफ करत असल्याची घोषणाही फडणवीस यांनी यावेळी केली. शेतकऱ्यांची पाटी कोरी झाली पाहिजे आणि त्याला त्या पाटीवर नव्याने इतिहास लिहिता आला पाहिजे, या दृष्टीने घेतलेला हा निर्णय आहे असे फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी करण्यात येत असलेल्या कामगिरीविषयी शेतकरी वर्गात समाधान असल्याचे या सोहळ्यात दिसून आले.

या सोहळ्याला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, भाजपा किसान मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस खा. अनिल बोंडे, आ. रणधीर सावरकर, आ. प्रवीण दरेकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे, भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षा आ. चित्रा वाघ, भाजपा महाराष्ट्र प्रदेश किसान मोर्चा अध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्यासह अनेक आमदार, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.


शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## प्रभाग क्र. ९ मधील रस्त्यांची दुरवस्था; कामे तातडीने सुरू करा - नगरसेविका रुपालीताई आंबेकर यांची मागणी



धाराशिव (प्रतिनिधी): धाराशिव शहरातील नगरपरिषद प्रभाग क्रमांक ९ मधील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या रस्त्यांची कामे तातडीने सुरू करण्यात यावीत, अशी मागणी नगरसेविका सौ. रुपालीताई सुनील आंबेकर यांनी आज नगराध्यक्ष सौ नेहा काकडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

निवेदनात त्यांनी प्रभागातील अनेक रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय (खराब) झाल्याचे नमूद केले आहे. रस्त्यांवरील मोठमोठ्या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच या खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

याशिवाय प्रभाग क्रमांक ९ मधील विविध रस्त्यांवर आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक उभारण्याची मागणीही करण्यात आली. परिसरात अनेक कोचिंग क्लासेस असल्याने विद्यार्थी मोठ्या संख्येने ये-जा करतात. मात्र काही वाहनचालक भरधाव वेगाने वाहने चालवत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने गतिरोधक उभारून अपघातांना आळा घालावा, अशी मागणी नगरसेविका आंबेकर यांनी केली.

यावेळी नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांनी निवेदनाची दखल घेत प्रभाग क्रमांक ९ मधील मंजूर रस्त्यांची कामे तसेच आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक उभारण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी नगरसेवक खलिफा कुरेशी, पंकज भोसले, अयाज उर्फ बबलू शेख, इस्माईल शेख, विशाल शिंगाडे, सुनील आंबेकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# तेलबिया उत्पादक संस्थांसाठी गोदाम बांधकामावर ५० टक्के अनुदान ; जुलैअखेरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

धाराशिव ॑ (जिमाका) गळीतधान्य उत्पादनाची सुरक्षित साठवणूक आणि शेतीमालाच्या मूल्यवृद्धीला चालना देण्यासाठी कृषी विभागामार्फत राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया अंतर्गत विशेष योजना राबविण्यात येत आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात गळीतधान्य पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असलेल्या, मात्र साठवणुकीची पुरेशी सुविधा उपलब्ध नसलेल्या भागांमध्ये २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदामांच्या बांधकामासाठी अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. जिल्ह्यास या योजनेसाठी तीन गोदाम बांधकामांचा भौतिक लक्षांक प्राप्त झाला असून,इच्छुक व पात्र संस्थांनी जुलै महिनाअखेरपर्यंत अर्ज सादर करावेत,असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

या योजनेअंतर्गत शेतकरी उत्पादक संस्था/ कंपनी (ऋञ्झजी), समूह आधारित व्यवसाय संस्था (CBBOs), सहकारी संस्था तसेच सरकारी व खासगी उद्योग यांना गोदाम बांधकामासाठी सहाय्य दिले जाणार आहे.या घटकांमध्ये मदत देताना 'व्हॅल्यू चेन पार्टनर' (तउझ) यांना प्राधान्य दिले जाणार आहे.

योजनेनुसार गोदामाची क्षमता २५० मेट्रिक टन असून, बांधकामाचा मापदंड प्रति मेट्रिक टन ११ हजार ५२१ रुपये निश्चित करण्यात आला आहे.या खर्चामध्ये अंतर्गत रस्ते,झएइ,विद्युतीकरण, रॉयल्टी,प्रयोगशाळा चाचणी शुल्क तसेच GST यांचा समावेश आहे. २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदामासाठी एकूण प्रकल्प खर्च २८ लाख ८० हजार २५० रुपये निश्चित करण्यात आला असून, त्याच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये (दोन्हीपैकी जी रक्कम कमी असेल ती) इतके अनुदान देण्यात येणार आहे.

ही योजना बँक कर्जाशी निगडित असून,अर्जदार संस्थांनी केंद्र शासनाच्या डच-ठढ किंवा महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भारतीय रिझर्व्ह बँकेने अधिकृत केलेल्या वित्तीय संस्थेकडून IFSC कोडसह कर्ज मंजूर करून घेणे आवश्यक राहणार आहे.

योजनेच्या अटी व नियमांनुसार संबंधित बाबीसाठी यापूर्वी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेतून लाभ घेतलेला नसावा. एकाच बाबीसाठी दोन वेगवेगळ्या योजनांमधून अनुदान घेतल्याचे आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.गोदामाच्या जागेची निवड,आराखडा व बांधकाम हे सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या तांत्रिक निकषांनुसारच करणे बंधनकारक असून,चालू आर्थिक वर्षातच बांधकाम पूर्ण करावे लागणार आहे.अपूर्ण किंवा अनधिकृत बदल केलेल्या बांधकामास अनुदान मंजूर होणार नाही.

गोदामाचा वापर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषीमालाच्या साठवणुकीसाठी योग्य व माफक दरात करणे बंधनकारक असून,यासाठी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड हमीपत्र सादर करावे लागणार आहे.गोदामाचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची रक्कम व्याजासह वसूल करण्यात येईल.

याशिवाय गोदामाचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी आणि पूर्ण झाल्यानंतर जिओ टॅगिंग (Geo Tagging) करणे तसेच सर्व बांधकामांची कृषी मॅपर पोर्टल (Krishi Mapper Portal) वर नोंद करणे अनिवार्य राहणार आहे.

इच्छुक संस्थांनी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्यता दिलेल्या डिझाईन्स,स्पेसिफिकेशन्स आणि खर्चाच्या अंदाजपत्रकासह (एींळारींशी) आपले अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे जुलै महिनाअखेरपर्यंत सादर करावेत.

लाभार्थी निवड प्रक्रिया जुलैअखेर पूर्ण केली जाणार असून,लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास लाभार्थ्यांची निवड सोडत (Lottery) पद्धतीने करण्यात येईल.तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या पूर्वसंमतीनंतरच कार्यारंभ आदेश (Work Order) देण्यात येतील.

अधिक माहितीसाठी तसेच अर्ज प्रक्रियेसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी किंवा मंडळ कृषी अधिकारी कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

## 'माणुसकी हाच खरा धर्म'चा संदेश देत महमंदखान महाराजांची दिंडी पंढरीकडे




कळंब(प्रतिनिधी)- विठ्ठल सर्वांचा आहे आणि माणुसकी हाच खरा धर्म आहे' हा संतांचा संदेश हृदयात जपत संत महमंदखान महाराजांची दिंडी भक्तिभावाने पंढरीच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. टाळ-मृदुंगाचा गजर, मुखी विठ्ठलनाम आणि अंतःकरणात सर्वधर्म समभावाची भावना घेऊन निघालेली ही दिंडी हिंदू-मुस्लिम ऐक्य, प्रेम, बंधुता आणि मानवतेचे दर्शन घडवत वारकरी परंपरेला नवी प्रेरणा देत आहे.

सुमारे ४०० वर्षांपूर्वी संत महमंदखान महाराज गणोरी येथे आले. तेथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात ते नियमित आराधना करत असत. सृष्टीचा निर्माता एकच आहे या अढळ श्रद्धेतून त्यांची विठ्ठलभक्ती अधिक दृढ झाली. त्यानंतर ते दरवर्षी आषाढी वारीत सहभागी होऊन पंढरपूरला जात असत.

संत महमंदखान महाराजांच्या समाधीनंतर काही काळ ही वारीची परंपरा खंडित झाली होती. मात्र, एसटी महामंडळाचे सेवानिवृत्त चालक अनिल देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेत २००६ पासून ही परंपरा पुन्हा सुरू केली. तेव्हापासून गणोरी येथील संत महमंदखान सेवा संस्था ट्रस्टच्या वतीने दरवर्षी पायदळ पालखी व दिंडी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान करते. यंदा या दिंडीचे २६ वे वर्ष असून, १९ जून रोजी गणोरी येथून निघालेली दिंडी २० जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविक सुमारे ६५० किलोमीटरचा पायी प्रवास करत आहेत. कळंब शहरात दिंडीचे आगमन होताच टाळ-मृदुंगाच्या निनादात, विठ्ठल नामाच्या जयघोषात आणि ज्ञानोबा-तुकाराम च्या गजरात भाविकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. सामाजिक सलोखा, सर्वधर्मसमभाव आणि मानवतेचा संदेश देणारी ही दिंडी वारकरी परंपरेतील ऐक्य, प्रेम आणि भक्तीचे प्रेरणादायी प्रतीक ठरत आहे.

आषाढी वारीत राज्यातील तीन मुस्लिम संतांच्या पालख्या देतात ऐक्याचा संदेश महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायात मुस्लिम संतांच्या नावाने निघणाऱ्या तीन प्रमुख पालखी-दिंड्या आजही सर्वधर्मसमभाव, मानवता आणि विठ्ठल भक्तीची परंपरा जपत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथून संत शेख महंमद महाराजांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान करते. संत शेख महंमद महाराज हे संत तुकाराम महाराजांचे समकालीन सुफी संत होते. पुणे जिल्ह्यातील माळेगाव येथून संत जैतुनबी यांच्या नावाने दिंडी निघते. त्यांच्या विठ्ठल भक्तीचा आणि सर्वधर्मसमभावाचा वारसा आजही अनुयायी जपत आहेत. तसेच अमरावती जिल्ह्यातील गणोरी येथून संत महमंदखान महाराजांची पायदळ पालखी दिंडी आषाढी वारीत सहभागी होते.

## पिके सुकू लागली, वाशीत ४० हजार हेक्टरवर दुबार पेरणीची धाकधूक




वाशी(प्रतिनिधी)-यावर्षी खरिपात रिमझिम पावसावर झालेल्या पेरणीमुळे आठ दिवसापासून उन्हाची तीव्रता वाढल्याने शेतकऱ्याची धाकधूक वाढली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत तब्बल एक महिना तालुक्यात पेरणी उशिरा सुरू झाली होती. जून महिन्याच्या शेवटी पावसाने कमी अधिक प्रमाणात हजेरी लावल्याने शेतकरी पेरता झाला होता. जुलै महिन्यात पहिले पाच ते सहा दिवस ढगाळ वातावरण आणि रिमझिम पाऊस यामुळे पेरणी केलेले पीक उगवले होते. पण त्याला वाढीस लागण्यासाठी मोठ्या पावसाची प्रतीक्षा असतानाच मागील आठ दिवसात पुन्हा उन्हाची तीव्रता वाढून ढगाळ वातावरण आणि पाऊस गायब झाला. अपेक्षित ओल नसल्याने पिकांनी माना टाकण्यास सुरुवात झाली आहे. खरिपाला तालुक्याचे ४९ हजार १९१ हेक्टर एवढीत सरासरी क्षेत्र आहे. ज्यापैकी ४१ हजार ६५९ हेक्टरवरच्या म्हणजे ९१.९६ टक्के पेरणी पूर्ण झालेली आहे. आणखीन काही शेतकऱ्यांनी अपेक्षित पाऊस नसल्याने पेरणी केलेली नाही. झालेल्या पेरणी क्षेत्रात एकट्या सोयाबीनचा पेरा हा ३९,०५३ हेक्टरवर झाला आहे. खरिपाचे पिक संकटात असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पुढील २ ते ३ दिवसात अपेक्षित पाऊस न झाल्यास संपूर्ण खरीप नुकसानीत जाणार आहे. खरिपणाबरोबर उसाचे क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांसमोर पाण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. एकंदरीतच तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थित निर्माण झालेली आहे.

२०२५ विमा मिळणार की नाही? मागील वर्षी मे महिन्यापासून सुरू झालेल्या पावसाने ऑगस्ट सप्टेंबर मध्ये धुमाकुळ घातल्याने जमिनी खरवडून गेल्या. ओढे,नाल्याचे आपले प्रवाह मार्ग बदलेले होते. सलग आणि अतिवृष्टी होऊन पिके पाण्यात जाऊन संपूर्ण वाया गेली होती. सरकारमधील मंत्री,स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाहणी करून नुकसान झाल्याचे मान्य केले. मात्र तालुक्यात अद्याप खरीप २०२५ चा विमा मिळणार की नाही याची स्पष्टता नाही.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# अणदूरच्या भावडांनी बनवले संस्कृत भाषेसाठी उपकरण



अणदूर-येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभागात कार्यरत असलेले संस्कृत विषयाचे अभ्यासक, संशोधक डॉ. गुरबसप्पा करपे व मुंबईस्थित त्यांच्या भगिनी कल्पना माशाळकर यांनी त्यांच्या समूहासह संस्कृत व्याकरणाचे अध्ययन अधिक सोपे, आकर्षक आणि अनुभवाधारित करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या 'व्याकरण शिकण्यासाठीचे ई-इंक उपकरण' या अभिनव शैक्षणिक उपकरणाच्या डिझाईनला भारत सरकारचे अधिकृत पेटंट मंजूर झाले आहे.

व्याकरण शिकण्यासाठीचे ई-इंक उपकरण संदर्भात केलेल्या संशोधनाच्या टीममध्ये सोलापूर येथील ॲड. मल्लिनाथ शहाबादे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भूगर्भशास्त्र विभागातील प्रा. डॉ. मंगेश वेदपाठक यांचा समावेश आहे. भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडवून आणणाऱ्या या नवकल्पनेला मिळालेली भारत सरकारची पेटंट मंजुरी ही संस्कृत शिक्षण क्षेत्रासाठी महत्त्वाची उपलब्धी मानली जात आहे. 'व्याकरण उपकरण'' हे ई-इंक तंत्रज्ञानावर आधारित स्पर्शसंवेदी शैक्षणिक साधन असून, त्याच्या विविध पृष्ठभागांवर पाणिनींची सूत्रे, रूपरचना-वृक्ष, शब्दनिर्मितीची प्रक्रिया आणि निवडक उदाहरणे प्रदर्शित होतात. विद्यार्थी उपकरण फिरवत संस्कृत व्याकरणातील विविध संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेऊ शकतात. त्यामुळे धातुरूपा पासून शब्दनिर्मिती आणि अर्थविकासापर्यंतचा प्रवास अधिक सहज आणि प्रभावीपणे समजतो.

या उपकरणामध्ये एनएफसी तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला आहे. विशेष अध्ययन-कार्ड उपकरणाला स्पर्श करताच संबंधित स्तरानुसार संस्कृत धडे, आवश्यक सूत्रे, शब्दसंग्रह आणि रूपरचनात्मक विश्लेषण तत्काळ उपलब्ध होते. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानपातळीनुसार टप्प्याटप्प्याने अध्ययन करता येते.संस्कृत व्याकरण अध्ययनातील पारंपरिक पद्धतींना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे हे उपकरण देश-विदेशातील संस्कृत अभ्यासक, विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. विशेषतः अवघड वाटणाऱ्या व्याकरणाच्या संकल्पना दृक्-अनुभवातून समजावून सांगण्याची क्षमता या उपकरणात आहे.

संस्कृतची आवड निर्माण होईल शाळा,महाविद्यालये, गुरुकुल,संस्कृत विद्यापीठे तसेच स्वयं-अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे उपकरण विशेष उपयुक्त ठरणार आहे. पारंपरिक व्याकरण अध्यापनाला डिजिटल आणि परस्परसंवादी स्वरूप देण्याची क्षमता या उपकरणामध्ये असून, विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत विषयाबद्दल आवड निर्माण करण्यासही त्याची मदत होणार आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649